|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ | अंक : ६ | सोमवार दि. २९ जानेवारी २०२४ ते रविवार दि. ४ फेब्रुवारी २०२४ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## पर्यवेक्षकाचा खून करून पळाले १३ वर्षांनी आरोपी पोलिसांना मिळाले


पुणे/क्राईम रिपोर्टर

**कोणताही आरोपी किती जरी शातीर असला तरी एक ना एक दिवस पोलीस त्याच्या मुसक्या आवळतातच. १३ वर्षांपूर्वी सेनापती बापट मार्गावरील एका सोसायटीत सिक्युरिटी एजन्सीतील पर्यवेक्षकाचा खून करून पाळलेल्या दोघांना अखेर पोलिसांनी अटक केली आहे.**

सेनापती बापट रस्त्यावर १३ वर्षांपूर्वी खून करून पसार झालेल्या सुरक्षारक्षकाला चतु:शृंगी पोलिसांनी राजस्थानातून अटक केली. खून केल्यानंतर पसार झालेला आरोपी राजस्थानात चणे- ...पान २ वर

## मुलाने काढलेल्या कर्जामुळे पित्याचे डोके फिरले रागाच्या भरात गर्भवती सून, नातवाला ठार मारले

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर



प्रत्येक माणसाने रक्ताची नाती जपताना कर्तव्याचे भान ठेवणे गरजेचे असते. आपल्यामुळे आपल्या कुटुंबातील लोकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची काळजी घ्यायची असते पण आजकाल लोक फक्त स्वत:चा विचार करतात. त्यामुळे त्यांना कौटुंबिक जबाबदारीचे भान राहत नाही. त्यातच आजकाल माणूस पैशाच्या मागे धावत असल्याने पैशासाठी त्याची कोणत्याही थराला जायची तयारी असते. पैसा व संपत्ती या दोन गोष्टींमुळे माणूस सर्व काही विसरतो. त्यातून कौटुंबिक वाद निर्माण होतात. याच वादातून सुडाची भावना निर्माण होते आणि या सुडाच्या भावनेमुळे माणसाला मैत्री किंवा नाती गोती यांचा विसर पडतो. सुडाने पेटलेल्या माणसाच्या हातून काहीही घडू शकते. आणि आजकाल माणूस छोट्या छोट्या गोष्टीवरून चिडतो आणि चिडलेला माणूस एखादे कृत्य करताना मागचा पुढचा विचार करीत नाही. बुलढाणा जिल्ह्याचा संग्रामपूरमध्ये नात्याला काळीमा फासणारी अशीच एक घटना घडली आहे. शेतीवर काढलेल्या कर्जाचे हप्ते मुलगा फेडत नव्हता. यामुळे एक बाप इतका चिडला की त्याने मुला वरचा राग सून आणि छोट्या नातवावर काढला आणि कुऱ्हाडीने गर्भवती सुनेची व लहान नात्वाची निर्घृणपणे हत्या केली. नारायण भिकाजी गायकी या ६५ वर्षीय इसमाने २५ वर्षीय सून अश्विनी गणेश गायकी, नातू समर्थ देवानंद गायकी या दोघांवर कुऱ्हाडीने वार केले. यामध्ये १० वर्षीय समर्थ देवानंद गायकी या बालकाचा जागेवरच मृत्यू झाला. गंभीर जखमी असलेली अश्विनी गणेश गायकी या महिलेला तातडीने उपचारासाठी शेगाव येथील रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र वाटेतच महिलेचा मृत्यू झाला. महिला ८ महिण्याची गरोदर असल्याची माहिती आहे. या प्रकरणी तामगाव पोलिसांनी ६५ वर्षीय आरोपी नारायण भिकाजी गायकी यांना अटक केली आहे. शेतीवर काढलेल्या कर्जाच्या वादातून एक वृद्ध इसम इतके टोकाचे पावूल उचलू शकतो अशी कल्पनाही कुणी करू शकत नाही. त्यामुळे या दुहेरी हत्याकांडाने संपूर्ण बुलढाणा जिल्हा हादरून गेला आहे.



बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूरमध्ये नारायण गायकी हे आपल्या कुटुंबासह राहतात. ते पूर्वी बुलढाण्यात नोकरीला होते त्यानंतर ते संग्रामपूर येथे आले त्यांची चार एकर जमीन आहे. याच जमिनीवर त्यांचा मुलगा देवानंद गायकी याने कर्ज काढले होते मात्र तो कर्जाचे हप्ते फेडत नव्हता त्यामुळे कर्जदार सतत दरात येऊन नारायण गायकी याना त्रास द्यायचे त्यावरून कुटुंबात नेहमी भांडणे व्हायची या भांडणात देवानंद याची पत्नी अश्विनी नेहमीच पतीची बाजू घेऊन सासऱ्याशी वाद घालायची त्यामुळे नारायण यांच्या मनात मुलगा आणि सून यांच्या विषयी परचांद राग होता सोमवारी देवानंद घरी नसताना सासरा व सून यांच्यात जोरदार भांडण झाले त्यामुळे नारायण भयंकर चिडले होते इतक्यात शाळेत गेलेला १० वर्षांचा नातू समर्थ घरी आला. त्यामुळे नारायण यांनी मुलगा सूनेवरचा राग नातवावर काढला आणि मागचा पुढचा जराही विचार न करता नात वावर कुऱ्हाडीने घाव घातले हा प्रकार बघून त्यांची गर्भवती सून व समर्थची आई पुढे आली असता तिच्यावरही कुऱ्हाडीने घाव घातले या हल्ल्यात नातू समर्थ जागीच ठार झाला तर अश्विनला गावातल्या लोकांनी जखमी अवस्थेत रुग्णालयात नेले पण उपचाराच्या दरम्यान तिचाही मृत्यू झाला . या घटनेनंतर पोलिसांनी नारायानला अटक करून त्याच्यावर दुहेरी हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.या प्रकरणी पोलीस निरीक्षक राजेंद्र पवार अधिक तपास करीत आहेत.

## शेजाऱ्यांची बायको मनात भरली पण तीच उत्तमची मृत्यूघंटा ठरली



मयत उत्तम



आरोपी सचिन

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर

**गडहिंग्लज जिल्ह्याच्या बिद्रेवडीत सचिन नाईक व उत्तम नाईक हे दोन शेजारी पण उत्तम नाईक याची वाईट नजर सचिनच्या बायकोवर पडली आणि दोघांमधले संबंध बिघडले. त्यातच सचिनच्या दारूच्या धंद्याची उत्तमने पोलिसांना टीप दिल्याचा सचिन याला संशय होता, याच संशयातून अखेर सचिन याने उत्तम याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सचिन याला अटक केली आहे.**

कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज तालुका हा तसा सधन शेतकऱ्यांचा तालुका म्हणून ओळखला जातो. नेसरी भागात अनेक शेतकरी ऊसाची शेती करीत असल्याने बरेच जण आपआपल्या शेतीवाडीत राहयला आहेत. नेसरी जवळील बिद्रेवाडी येथे उत्तम भरमू नाईक आणि सचिन नाईक हे दोघेजण एकमेकांच्या शेजारी राहयला आहेत. दोघे ही एकाच भावकीतील तर दोघांची शेती ही जवळजवळ असल्याने दोघांचे ही एकमेकांच्या घरी येणे जाणे होते. सचिन नाईक याची बायको तशी दिसायला देखणी आणि सुंदर असल्याने कुणी ही तिच्या पाहताच क्षणी प्रेमात पडावे असे तिचे सौंदर्य होते. उत्तम हा सचिनच्या घरी सारखा येत जात असल्याने त्याची नजरा नजर ही सचिनच्या बायकोबरोबर होत होती. मनातून उत्तम याला सचिनची बायको आवडत ही होती. परंतु त्याने ही गोष्ट कधी जग जाहिर केले नाही.तो आपल्या मनातील गोष्ट भावना आपल्या मनात ठेवूनच होता. परंतु ज्यावेळी तो सचिनच्या बायकोकडे पाहत असायचा त्यावेळी सचिनच्या बायकोला त्याच्या मनात काय चालले आहे हे तिने ओळखले होते. तसा उत्तम हा वयाने ही जास्त होता. त्यामुळे ती काही त्याला तसा प्रतिसाद देत नव्हती. तो आपल्या घराच्या ओसरीवर बसून सारखे तिच्याकडे पाहत असायचा. त्यामुळे ती त्याची नजर चुकवीत होती. सचिनची थोडी फार शेती असली तरी तो ब्रिदेवाडी गावात चोरून दारू ही विकत असायचा. त्यामुळे त्याची ओळख ही चांगल्या आणि व्यसनाधीन लोकांशी होती. तो ही त्याच्याबरोबर दारू पित असायचा. दारूच्या बैठकीत तो बसला की कधी कधी मित्रात उत्तमचा विषय निघत असायचा. तो बाईलवेडा असल्याचे त्याच्या मित्राचे म्हणणे होते. त्याला गावातील दुसऱ्याच्या बायका आवडतात तो त्याच्याशी सलगी करण्याचा प्रयत्न करतो हे ही त्यांना माहित होते. त्यातच मित्राने उत्तम विषयी असे बोलल्याने सचिनच्या मनात शंकेची पाल चुकचुकत होती. कारण मागे एकदा त्याच्या बायकोने त्याला उत्तम भावोजी माझ्याकडे बघून मला खुणवत असतात हे सांगितले होते. त्यामुळे सचिनचे डोके ही सणकले होते.त्यातच चोरून दारू विकत असल्याची माहिती कुणी तरी पोलीसांना टीप दिली असल्याने बेकायदा दारू ...पान २ वर

## साला शब्दावरून अर्थाचा अनर्थ झाला पत्नीच्या सांगण्यावरून भावाचा खून केला

जळगाव/क्राईम रिपोर्टर



मयत धनराज

**एखाद्या माणसाच्या मनात दुसऱ्या विषयी राग असला की मग त्याला सूड घेण्यासाठी केवळ निमित लागते अशावेळी त्याला सध्या संशय आला तरी तो संशय सुधा निमित्त ठरू शकतो जळगाव जिल्ह्याच्या रधुरीत दोन मित्रांच्या गप्पा गोष्टीत सा ल्या हा शब्द आला त्यावरून हा शब्द उच्छारणाऱ्याला त्याच्या चुलत भावाच्या पत्नीने जाब विचारला व तू माझ्या नवऱ्याला साला अशी शिवाय दिले असा आरोप केला यावरून झालेल्या भांडणात त्या महिलेच्या पतीने साला हा शब्द उच्चारणाऱ्या आपल्या चुलत भावाच्या डोक्यात लोखंडी दांडा मारून त्याची हत्या केली. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

साधारण १०८ वर्षांपुर्वी संशयकल्लोळ नावाचे एक नाटक फार गाजले होते. सन १९१६ मध्ये या मुळ नाटकाचा पहिला प्रयोग झाला होता. गोविंद बल्लाळ देवल हे या नाटकाचे लेखक होते. मराठी संगीत नाटकांच्या युगात संशयकल्लोळ हे नाटक त्याकाळी फार लोकप्रिय झाले. अर्धवट माहितीवर विश्वास ठेवून काहीतरी संशय घ्यायचा आणि तो संशय खरा धरुन त्याच्यावर पुढील मनसुबे रचायचे. मग त्यातून संशयात अजून भर आणि त्यातून गोंधळ असा प्रकार या नाटकात दाखवण्यात आला होता. या प्रकाराला आपण ...पान २ वर

## पैशाच्या वादातून शिक्षकाचा खून केला शातीर खुनी पोलिसांच्या जाळ्यात आला

विरार/एस.कुमार



मयत नागेश



**पैशावरून झालेले वाद कधी कधी प्राणघातक ठरतात. विरारमधे अशाच वादातून एका शिक्षकाला प्राण गमवावे लागले. विरारमध्ये राहणाऱ्या नागेश सेनिगरपू या शिक्षकाने हाताच्या दोन्ही नसा कापून आत्महत्या केल्याची घटना निदर्शनास आली होती. पण प्रत्यक्षात चौकशीत हा खून असून त्याला आत्महत्येचे स्वरूप देण्याचा प्रयत्न झाल्याचे पोलिसांच्या लक्षात येताच त्यांनी कसून तपास केला व आरोपीला बेड्या ठोकल्या.**

प्रा. नागेश सेनिगारापू (वय ४८) हे मालाड येथील एका प्रख्यत कॉलेजवर प्राध्यापक होते. ते वाणिज्य संशोधन केंद्राचे प्रमुख होते. तिथे त्यांनी १३ वर्षांपेक्षा जास्त काळ काम केले होते आणि पीएचडी विद्यार्थ्यांचे ते मार्गदर्शक होते. सेनिगारापू यांना १८ जानेवारी रोजी पदोन्नती मिळाली होती. ६० हजार रुपयांवर काम करणारे प्रा. नागेश सेनिगारापू यांना पदोन्नती मिळाल्याने त्यांना आता १.५ लाख रुपये वेतन मिळणार होते.त्यामुळे ते खूप खुश होते. हा त्यांच्या आयुष्यातील आनंदाचा मोठा क्षण होता. ते अत्यंत आनंदी होते. प्रमोशन वेळेवर व्हावे, यासाठी त्यांनी खूप पेपरवर्क केले होते. असे हे प्रा. नागेश सेनिगारापू (वय ४८) हे विरार पश्चिम येथील एका अपार्टमेंटमध्ये एकटेच राहत होते. २२ जानेवारी रोजी ते फोन कॉल्सना कुठलाच प्रतिसाद देत नसल्याने त्यांचा भाऊ फ्लॅटवर पोहोचला, तेव्हा त्याला बेडरूममध्ये दोन्ही हाताची मनगटं कापलेल्या अवस्थेत प्रा. नागेश सेनिगारापू आढळले. भावाने लगेच या घटनेची माहिती अर्नाळा पोलिसांना दिली. अर्नाळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस ...पान २ वर

## अनैतिक संबंधाला विरोध केल्याने संताप वाढला प्रियकराच्या मदतीने पत्नीने पतीचा काटा काढला

रत्नागिरी/क्राईम रिपोर्टर



मयत सुरेश

**पर पुरुषाच्या नादाला लागलेली बाई पतीला अजिबात जुमानत नाही. तसेच ती समाजाचाही विचार करीत नाही. अशावेळी तिच्या अनैतिक संबंधात पतीचा अडथळा आला तर ती पतीचीही हत्या करायला मागेपुढे पाहत नाही. रत्नागिरीत अशाच एका घटनेत एका महिलेने प्रियकराच्या मदतीने ६४ वर्षांच्या पतीची हत्या केली व दुसऱ्या कोणाच्या तरी मारहाणीत पतीचा मृत्यू झाल्याचा बनाव केला. पण पोलिसांनी तिचा हा बनाव हाणून पडला व तिला तिच्या प्रियकरासह अटक केली.**

रत्नागिरी तालुक्यातील जयगड जवळ नांदिवडे येथे पत्नीने ६४ वर्षीय पतीची हत्या केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. नांदिवडे येथील सुरेश धोंडू पडवळ (वय वर्ष ६४ राहणारे नांदिवडे भंडारवाडी) यांचा शुक्रवारी सकाळी पत्नीने धारधार हत्याराने खून केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. या घटनेने अवघे रत्नागिरी हादरले आहे. सुरुवातीला आपण काही केले नाही, असा कावा करणाऱ्या पत्नीचा आणि संशयित प्रियकराचा हा सगळा बनाव ग्रामस्थांची समसूचकता आणि पोलिसांची तत्परता यामुळे उघड झाला आहे. पत्नीने धारदार सुरीच्या साह्याने हा खून केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. २६ जानेवारी रोजी शुक्रवारी ...पान २ वर

## पळवून आणलेल्या बाईने विश्वासघात केला अक्षयच्या हातून तिच्या याराचाच खून झाला

सांगली/क्राईम रिपोर्टर



**कोणत्याही बाईला जर शरीरसुख मिळालं नाही तर ती दुसऱ्याच्या नदी लागते आणि त्याच्याकडून ते सुख घेते. अक्षयने पळवून आणलेल्या बाईचेही असेच झाले. अक्षय दारू पिऊन तिला मारहाण करायचा म्हणून तिने त्याच्या मित्रशीच सुत जुळविले. मात्र ही गोष्ट अक्षयला समजताच तो चिडला आणि त्याने मित्र नामदेव याच्याशी वाद घालू लागला. हा वाद इतका विकोपाला गेला की अक्षय याने आपल्याकडच्या कोयत्याने वार करून नामदेवची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांमनी आरोपी अक्षय याला अटक केली आहे.**



सातारा जिल्हयातील कराड तालुक्यातील जुळेवाडी येथील अक्षय शिंदे हा विवाहित असून देखील त्याचे एका विवाहित महिलेसोबत प्रेम संबंध जुळले. अक्षय हा ऊस तोडणी मजुर म्हणून काम करीत असल्याने सध्या तो कडेगाव येथील सोनहिरा साखर कारखान्याची ऊस तोड करीत होता.अक्षय याची मैत्रिण सुजाता (काल्पनिक नांव) ही स्वभावाने हसत खेळत असायची.ती बोलक्या स्वभावाची असल्याने ती कोणाबरोबर ही आडपडदा न ठेवता सहजच बोलत असायची. अक्षयने तिला पळवून आणल्याने तीने आपल्या शिवाय कोणाशी बोलू नये किंवा कोणाबरोबर संबंध ठेवू नयेत असे अक्षयला वाटत होते.ते दोघे ही अंबक येथील आदम तांबोळी याच्या भाडयाच्या खोलीत राहयला आहेत. अक्षय हा सकाळी कामावर गेला की संध्याकाळी उशिरा घरी येत होता.ऊस तोडणीच्या कामाच्या शिणवाटयामुळे अक्षयला दारू पिण्याची सवय होती. कामावरून येतानाच तो ...पान ६ वर

## उसन्या पैशाच्या वादातून संपली दोस्ती यारी मित्रांनीच तोडली मित्राच्या आयुष्याची दोरी





नाशिक/क्राईम रिपोर्टर

**आजकाल पैसा हाच माणसाचे सर्वस्व बनलेला आहे. त्यामुळे पैशा समोर नाती गोती सर्व काही तुच्छ ठरतात. नाशिक जिल्ह्याच्या साकोरीत अशाच एका घटनेत उसने घेतलेले पैसे देण्यास टाळाटाळ करणाऱ्या एका इसमाची त्याच्याच दोन मित्रांनी हत्या केली. मात्र पोलिसांनी या खुनी मित्रांना अटक केली आहे.**

अडचण प्रत्येकाला असते आणि अडचणीत सापडलेल्या माणसाला मदत करणे हे मैत्रीचे व नात्याचे कर्तव्यच असते. तसेच अडचणीत केलेल्या मदतीची परतफेड करणे ही जबाबदारी असते, पण हक्काने उसनवारी करणारे काही जण परतफेड करण्याची ...पान ६ वर


## चारित्र्याच्या संशयाने संसाराचा घात झाला समुद्रात बुडवून पतीनेच पत्नीचा खून केला

गोवा/क्राईम रिपोर्टर



आरोपी गौरव

**पती पत्नीच्या नात्यात जर दुरावा आला तर त्याचे विपरीत परिणाम होतात. खास करून चारित्र्याच्या संशयावरून पती पत्नीत दुरावा येतो. गोव्यात रहाणाऱ्या दिशा आणि गौरव या दांपत्याच्या बाबतीत असेच झाले. दोघांचा एकमेकांच्या चारित्र्यावर संशय होता. त्यातून त्यांची भांडणे व्हायची. याच भांडणाला कंटाळून एक दिवस गौरवने दिशा हिला समुद्रावर फिरायला नेलं आणि समुद्रात बुडवून तिचा जीव घेतला. मात्र किनाऱ्यावरून एका इसमाने या घटनेचा व्हिडिओ बनवलेला असल्याने आरोपी गौरव याला अटक करणे सोपे झाले.**



काब दि राम समुद्रात ती तरूणी बुडतानाचा मोबाईल व्हिडीओ एका पर्यटकाने चित्रित केला होता. त्या तरूणीला बुडवून एक तरूण बाहेर येताना ही दिसत होता. पोलीसांनी या अधारे त्या तरूणाला ताब्यात घेऊन चौकशी केली असता तो तरूण त्या तरूणीचा पती असल्याची माहिती मिळाली. त्याचे नाव गौरव कटियार. तो मुळाचा उत्तरप्रदेशातील लखनऊ येथील असून त्याचे हॉटेल मॅनेजमेटचे शिक्षण झाले असून तो कोलवा येथील एका थ्री स्टार हॉटेलमध्ये मॅनेजर म्हणून काम करीत ...पान २ वर

29 JANUARY TO 04 FEBRUARY 2024 - Page 2 (CRIME SANDHYA)_Layout 1 27-01-2024 22:14 Page 1



पान १ वरून...

## चारित्र्याच्या संशयाने संसाराचा घात...

आहे. त्याचे गेल्या दोन वर्षापूर्वी दिक्षा गंगावर नावाच्या तरूणीसोबत विवाह झाला ती उत्तर प्रदेशातील आपल्या सासरी लखनऊ येथील श्रध्दानगर येथे राहत होती, मात्र गेल्या सहा महिन्यापूर्वी गौरवने तिला गोव्यात आणले. आपल्या पतीला गोव्यात चांगला पगार आहे, तो चांगल्या ठिकाणी काम करीत आहे हे तिला माहित होते. गोव्यातील कोलवा येथेच ते दोघे एका अपार्टमेंटमध्ये ता भाडयाने राहु लागले. या सहा महिन्याच्या दरम्यान दोघा नवरा बायकोत या ना त्या कारणातून सतत भांडणे होत होती. या भांडणात तो तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता तर ती त्याला तुझेच बाहेर कुठल्या तरी महिलेबरोबर संबंध आहेत असे म्हणत होती. त्यांची भांडणे विकोपाला गेली. खरे तर त्याचे नवीनच लग्न झाले होते. संसार हा त्या दोघांचा होता. या संसारात दोघांचा ही एकमेकांवर विश्वास असणे गरजेचे होते परंतु तसा विश्वास हा त्या दोघात नव्हता. तिला वाटत होते की, गौरवने त्याच्या इच्छेविरूध्द आपल्या बरोबर लग्न केले असावे म्हणून तो आपल्याशी नीट वागत नाही. दिक्षा ही दिसायला सुंदर आणि सेक्सी असल्याने गौरव तिच्यावर संशय घेत होता.लखनऊ येथील आपल्या मुळ गावी असताना तिचे गावातील एका तरूणाबरोबर सुत जमले असल्याची माहिती त्याला मिळाली होती. पण ती माहिती खोटी होती.त्या माहितीच्या अधारेच तो तिच्या चारित्र्यावर संशय घेऊ लागला. त्यामुळे त्याला दिक्षा नको होती. तिला गावाकडे ठेवून आपण येथे दुसरे लग्न करून आरामात राहयचे असे त्याने ठरविले. खरे तर दोघे ही सुशिक्षीत पण दोघांत समन्वय हा नव्हता. त्याच्या डोक्यात तिच्या चारित्र्याचा संशय घोळत असल्याने तो किडा त्याच्या डोक्यात वळवळत होता.देखणी बायको दुसऱ्याची असते अगदी तसेच त्याचे झाले होते.तो त्याच नजरेने दिक्षाकडे पाहत होता.हल्ली तर ती गोव्यात आल्यापासून सारखी मोबाईलवरून कुणीशी तरी बोलत होती, त्याच्याची चॅटिंग करीत होती. हे त्याच्या लक्षात आले होते. म्हणून तो तिच्याशी भांडण काढत होता. येथे त्याला नोकरी करायची असल्याने तो इथेच थांबणार होता. त्याच्या मनातून ती उतरली असल्याने तो तिला लखनऊनला जा असे सांगून भांडण काढत होता. भांडणात ती त्याला मी तुझी बायको आहे, तु मला एकटीलाच का गावाकडे जा म्हणून सांगतो आहेस असे म्हणत तुझेच येथे कोणत्या तरी महिलेशी अनैतिक संबंध आहेत म्हणून तु मला गावाकडे जा म्हणून सांगत आहेस असे म्हणून त्याच्याशी भांडण काढून आपल्या जीवाचा त्रागा करून घेत होती. तशी ती भांडखोर आणि चिडखोर स्वभावाची असल्याने त्या दोघात नेहमी खटके उडत होते. दोघे ही एकमेकांना समजून घेत नव्हते. लग्नाला अवघी दोन वर्ष झाली असल्याने तसे दोघांना ही सेट व्हायला अजून वेळ होता. पण दोघांचा स्वभाव हा शंकेखोर असल्याने दोघे ही एकमेकावर शंका घेत होते. हल्ली तर तो तिच्याबरोबर झोपत ही नव्हता. पती म्हणून तो काही ही करीत नसल्याने तिच्या संशयाला बळकटी येत होती. ती त्याला सोडून जायला तयार नव्हती याचा राग गौरवला येत होता.काही तरी करून तिला गावी घालवायचेच असे त्याने ठरविले होते. आता मात्र हद्द झाली होती. भांडणात ती त्याच्याच वर्मावर पुरूषार्थवर बोट ठेवू लागली होती.कधी कधी तर ती त्याला म्हणत होती तु माझ्याबरोबर झोपत नाहीस, मला शारिरीक सुख देत नाहीस तर मग मी काय करू तिच्या या प्रश्नाने तो चिडत होता. त्याला तिचा संशय होता तर तिला त्याचा संशय होता. कोणाचा कोणाला ताळमेळ नव्हता. नवरा बायकोच्या भांडणाने एक वेगळेच वळण घेतले होते.पै पाहुण्यानी मध्यस्थी ही करून पाहिले होते. परंतु त्यांना यश आले नाही. दिक्षाच्या आई वडिलांनी ही गौरवला समजावून सांगून पाहिले परंतु तो काही ऐकत नव्हता. त्याला दिक्षाला कोणत्याही परिस्थीतीत लखनऊला पाठवयाचे होते.ती गेली की, त्याला रान मोकळेच होते. खरे तर त्याचेच गोव्यातील एका महिलेशी अनैतिक संबंध होते. तो ते लपवून ठेवू पाहत होता हे दिक्षाच्या लक्षात आले होते. म्हणून ती त्याला सोडून जायला तयार नव्हती. ती सोडून जात नसल्याने आणि आपल्या मार्गात तिचा अडथळा निर्माण होत आहे हे लक्षात आल्यावर गौरवच्या मनात दिक्षाला संपविण्याचा विचार आला.त्यासाठी तो प्लॅन करू लागला. त्याला गोव्यातील बिचेसची संपुर्ण माहिती होती. दक्षिण गोव्यातील काब दि. राम हा बीच तसा निर्मनुष्य असतो तेथे पर्यटकांची फारसी वर्दळ नसते. तसेच त्या बीचवर जायला डोंगर ओलांडून जावे लागते हे त्याला माहित होते. तेथे दिक्षाला नेऊन तिचा घात करायचा असो विचार त्याने केला. शुक्रवार दि.१९ जानेवारी रोजी त्याने दिक्षाला कोलवा येथील आपल्या घरातून गोड बोलून आपण बाहेर फिरायला जावू असे सांगितले. तिच्या मनात काही नसल्याने ती ही तयार झाली. काही झाले तरी तो तिचा नवरा होता पण हाच नवरा तिचा काळ बनून येणार आहे हे तिला माहित नव्हते. गोव्यात पर्यटकांना फिरण्यासाठी बाईक आणि कॅब भाडयाने मिळतात हे त्याला माहित होते.दुपारी ३.३०च्या दरम्यान त्यांनी कोलव्यातून एक बाईक भाडयाने ठरवली.त्या बाईकवरून ते दोघे काब दि.राम या बीच जवळ आले. बीचजवळ गाडी पार्क करून ते दोघे डोंगर उतरून खडकाळ दगडावरून त्या बीचवरील एका निर्मनुष्य अशा ठिकाणी एका आडोशाला जावून बसले. त्या दोघात तेथे वादावादी सुरू झाली. तू लखनऊला जा.मी येथेच राहणार आहे. असे तो तिला सांगत होता पण ती काही त्याचे ऐकत नव्हती.त्यावेळी गौरव चिडून तिच्या गळयाभोवती हात घालून तिचा गळा आवळू पाहत होता. परंतु ती सावध असल्याने त्याला काही करता येत नव्हते. त्यावेळी त्याने आजुबाजुला पाहून तिला मारहाण करीत त्या पाण्यात ढकलून दिले. पाणी जास्त खोल नव्हते. तरी पण ती बुडत होती. त्यात तिला पाण्यात पोहत येत नसल्याने ती जीव वाचविण्यासाठी ओरडत होती हे बघून गौरव त्या पाण्यात उतरला त्याने तिला वाचविण्या ऐवजी तिला त्या पाण्यात बुडवून मारले. त्यावेळी तेथे पर्यटकांची दोन चार जोडपी होती. त्यात ही महाराष्ट्रीयन जोडपे होते. ते जोडपे आपल्या मोबाईल कॅमेऱ्यातून शुटिंग करीत असताना त्यांना एक तरूणी खडकाळ भागातील पाण्यातील प्रवाहात वाहत येवून दगडावर आदळत असल्याचे दिसत होते. दोन चार वेळा तसे होताना पाहून त्या पर्यटकाने पाहिले.त्यात गौरव हा शर्टाची हातोफा आणि पॅन्ट गुडघ्यापर्यत वर करून दिक्षाला बुडवून बाहेर येताना दिसत होता. हे सगळे क्षण त्या पर्यटकाने आपल्या कॅमेऱ्यात कैद बध्द केले.त्या पर्यटकाला शंका आल्याने त्याने आरडा ओरडा करीत लोक जमविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी गौरवने नाटक करीत त्या पर्यटकासोबत दिक्षाला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. परंतु ती बाहेर येण्यापूर्वीच तिचा पाण्यात बुडून मृत्यू झाला होता. गौरव कुठे तरी पळून जाण्याच्या अगोदर त्या पर्यटकाने जवळच्या कुंकळळी पोलीस स्टेशनला फोन करून या घटनेची माहिती दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले.त्यांनी पाण्यातून बाहेर आलेल्या दिक्षाच्या मृतदेहाचा पंचनामा करून या घटनेची माहिती घेतली. गौरव आणि दिक्षा हे दोघे पती पत्नी असल्याची माहिती गौरवने पोलीसांना दिली. तुझी पत्नी पाण्यात कशी बुडाली असे पोलीसांनी विचारले असता गौरवने त्याना सांगितले की, ती बीचवर आईसक्रिम आणायला जात असताना खडकावरून पाय घसरून पाण्यात पडली.मी तिला वाचविण्याचा प्रयत्न केला परंतु मी तिला वाचवू शकलो नाही.पोलीसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी कोलवा येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या शवविच्छेदन अहवालात मयत दिक्षा हिच्या शरीरावर खरचटल्याच्या खुणा दिसत होत्या. याचा अर्थ गौरवने तिला मारहाण करीत खडकावरून पाण्यात ढकलून दिले होते. या घटनेची माहिती गौरवकडून घेत असताना त्याच्या बोलण्यात पोलीसांना विसंगती जाणवत होती. तसेच घटनेच्यावेळी पोलीसांनी एका महाराष्ट्रीयन पर्यटकाकडून माहिती घेतली असता वेगळेच दिसत होते. त्या पर्यटकाने आपल्या कॅमेऱ्यात त्या घटनेचे चित्रण केले होते.त्यामध्ये तिला पाण्यात बुडवून मारून गौरव पाण्यातून बाहेर येत असल्याचे दिसत होते. त्याच्याकडे पोलीस आधिक चौकशी करीत असताना त्याच्या बोलण्यात विसंगती आढळून येत होती. कुंकळळी पोलीसांनी या घटनेची माहिती लखनऊ येथील दिक्षाच्या आई वडिलांना दिली. ते ही या घटनेची माहिती समजाताच लागलीच गोव्याला आले. त्यांनी पोलीसांना माहिती दिली की, त्याचा जावाई गौरव कटियार याचे गोव्यातील एका महिलेबरोबर अनैतिक संबंध असल्याने त्या संबंधात आपल्या मुलगीचा अडथळा ठरत असल्याने त्याने तिला जाणून बुजुन मारून टाकले आहे. दिक्षाच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीसांनी दिक्षा गंगवारव (२३) हिच्या खून प्रकरणी तिचा पती गौरव कटियार (२९) याच्या विरोधात ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला प्रथम वर्ग न्यायालयात हजर केले असता मा. कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान गौरव कटियार याने आपले गोव्यातील एका महिलेबरोबर विवाहबाहय संबध असून त्याला तिच्याबरोबर लग्न करायचे असल्याने मी दिक्षाला मारले असल्याची कबुली त्याने दिली.या घटनेचा पुढील तपास कुंकळळी पोलीस करीत आहेत.

## शेजाऱ्यांची बायको मनात भरली...

विक्री प्रकरणी पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन केस घातली. हे प्रकरण त्याच्या चांगले अंगलट आले होते. त्यातच ही टीप उत्तम यानेच दिली असल्याचे सचिन याला समजले होते. म्हणून तो त्याचेवर अगोदर चिडून होता. उत्तम याला कसा धडा शिकवायचा याचा तो विचार करीत होता. त्यातच त्याच्या बायकोने त्याला उत्तम याच्या विषयी सांगितले असल्याने तो जास्तच त्याचेवर चिडला होता. आपल्या बायकोवर तो वाईट नजर ठेवत आहे त्यामुळे त्याला याचा जाब विचारायचा असे त्याने ठरविले.दारूच्या नशेत सचिनने उत्तमला त्याने एकदा विचारून तु माझ्या बायकोकडे सारखा का बघत असतोस असे विचारल्यावर उत्तम याने माझ्या मनात तसले काही नाही त्यामुळे तु काय हा विषय काढू नकोस असे सांगत त्या विषयावर पडदा टाकला. त्यानंतर दिवसा मागून दिवस जात होते. त्यानंतर ही तो सचिनच्या बायकोकडे बघत होता. आता तर सचिन याने परत उत्तम नाईक बरोबर भांडण काढून त्याला परत याचा जाब विचारीत तु माझ्या बायकोकडे का सारखा बघतोस, तुला आता जिंवत ठेवीत नाही अशी धमकी दिली. त्याच्या या धमकीला उत्तम काही घाबरला नाही. सचिनची बायको घराच्या बाहेर दिसली की, तो तिच्याकडे सारखा बघत होता. याचा तिला ही राग येत होता. म्हातारा घोडा माझ्याकडे काय बघतोय असे म्हणत ती त्याला शिव्या देत जायची. तरी ही त्याची खोड मोडत नव्हती. रविवार दि.७ जानेवारीला रात्री सचिन हा दारूच्या नशेत घराकडे आला. आधीच त्याला उत्तम याचा राग आलेला होता. त्यातच त्याचे बायकोबरोबर भांडण झाले. त्या भांडणात त्याच्या बायकोने तुम्ही उत्तम भावोजीना का सांगत नाही, अशी तक्रार केली. त्यावेळी उत्तम हे जेवण करून आपल्या घराच्या बाहेरील ओसरीवर निवांत बसले होते. त्याच्या समोर अचानक सचिन हा आला. तो दारूच्या नशेत होता. उत्तम जवळ जाऊन सचिन त्याला म्हणाला, दादा तुम्हाला परत परत किती वेळा हो सांगायचे, तुम्ही माझ्या बायकोकडे का एवढे बघातयं, थांबा तुम्हाला आता सोडतच नाही असे म्हणत त्याने बाजुलाच पडलेला लाकडी दांडका हातात घेतला आणि उत्तम याच्या डोक्यात जोरात हाणला. त्यासरशी उत्तम हे जोरात ओरडत खाली पडले. त्याच्या डोक्याला मोठा मार लागल्याने ते ओरडतच जागीच बेशुध्द पडले. त्याच्या ओरडण्याच्या आवाजाने त्याच्या घरातील बायका मुले बाहेर आले. त्याचा भाऊ ही शेजारच्या घरातून बाहेर आला. समोर हातात लाकडी दांडका घेऊन सचिन हा उभा होता. तो शिव्या देत होता. मर साल्या माझ्या बायकोकडे बघतोस काय? आणि माझी टीप पोलीसांना देतोस काय? असे म्हणत होता. उत्तमच्या घरातून काय झाले हो म्हणत त्याची बायको ओरडत बाहेर आल्यावर सचिन हा त्यांना बघून पळून गेला. बेशुध्द पडलेल्या उत्तम यांना त्याच्या घरच्या लोकांनी नेसरी येथील दवाखान्यात उपचारासाठी नेले.त्याची नाजुक परिस्थीती बघुन तेथील डॉक्टरांनी त्यांना उपचारासाठी गडहिंग्लज येथील दवाखान्यात घेऊन जाण्यास त्याच्या नातेवाईकांना सांगितले. त्यानुसार त्यांना गडहिंग्लज येथील दवाखान्यात नेले. त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्त स्त्राव झाला होता.तेथे त्याच्यावर उपचार सुरू असताना १४ जानेवारी रोजी त्याचा मृत्यू झाला. सचिन नाईक याने लाकडी दांडक्याने मारहाण केल्याने त्याचा उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याने मयत लक्ष्मण नाईक यांनी नेसरी पोलीस ठाण्यात या संर्दभात तक्रार दाखल केली. या घटनेनंतर सचिन नाईक हा पळून गेला असल्याने त्याच्या शोधासाठी पोलीस अधिक्षक महेंद्र पंडित यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पो.निरी.रविंद्र कळमकर यांना तीन पथके तयार करण्यास सांगितले. तो गावातून पळून गेला असल्याने पोलीस त्याचा शोध घेत होते. पोलीसांच्या एका पथकाला सचिन नाईक गडहिंग्लज येथील एका नातेवाईकांच्या घरात लपला असल्याची माहिती मिळाली. पोलीसांनी तेथे सापळा लावून त्याला ताब्यात घेतले. त्याला नेसरी पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती त्याने पोलीसांना दिली. मयत उत्तम हा आपल्या बायकोकडे सारखा बघत होता तसेच त्याने माझी टीप पोलीसांना दिली असल्याची मला शंका होती म्हणून मी त्याला रागाच्या भरात लाकडी दांडक्याने मारहाण केली. त्यात त्याचा मृत्यू झाला. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यानंतर मयत उत्तम नाईक याचा भाऊ लक्ष्मण नाईक याने दिलेल्या फिर्यादीनुसार उत्तम नाईक (वय ५०) याच्या खून प्रकरणी सचिन नाईक (वय ३५) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२, प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला गडहिंग्लज येथील प्रथम वर्ग न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला लाकडी दांडका जप्त केला. या घटनेचा तपास पो.निरी. रविंद्र कळमकर याच्या नेतृत्वाखाली उप.निरी.संदीप जाधव, शेष मोरे, अमोल कोळेकर, महेश गवळी, अमित सर्जे, समीर कांबळे, नवनाथ कदम, शिवानंद मठपती, तुकाराम राजीगिरे, सुशिल पाटील, यशवंत कुंभार, राजेंद्र वरंडेकर, अजय गोडबोले यांनी केला. भांडणात कुठला राग कोण कोणावर काढेल याचा नेम नाही. खूना सारख्या घटनेला क्षुल्लक कारण ही पुरेसे ठरत असल्याचे या घटनेवरून दिसून येते.

## पर्यवेक्षकाचा खून करून पळाले...

फुटाण्यांची विकी करत असल्याचे उघडकीस आले आहे. बिट्टी ऊर्फ श्यामबाबू छोटेलाल यादव असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. सेनापती बापट रस्त्यावरील अंबिका सोसायटीतील नियोजित गृहप्रकल्पात राजा ऊर्फ रज्जवा रामकेश यादव आणि बिट्टी ऊर्फ श्यामबाबु यादव सुरक्षा रक्षक होते. १५ मार्च २०११ रोजी रात्री अकराच्या सुमारास सिक्युरिटी एजन्सीतील पर्यवेक्षक बाबुराव मोघेकर तपासणीसाठी गेले होते. त्यावेळी त्यांच्याशी दोघांचा वाद झाला. दोघांनी मोघेकर यांचा खून केला. त्यानंतर श्यामबाबू यादव पसार झाला होता. श्यामबाबू उत्तरप्रदेशातील चित्रकुट जिल्हयातील आहे. चतु:शृंगी पोलिसांचे पथकचित्रकुटमधील पहाडी गावात गेले होते. मात्र, त्याचा ठावठिकाणा लागला नव्हता. त्याचा मोबाइल क्रमांक पोलिसांना मिळाला होता. तांत्रिक तपासात तो राजस्थानमधील झालावाड जिल्ह्यात वास्तव्यास असल्याचे समजले. पोलीस पथकाने तेथून त्याला ताब्यात घेतले. तेव्हा तो राधेश्याम नावाने तेथे वास्तव्य करत असल्याचे आढळून आले. झालवाड परिसरात तो चणे-फुटाणे विक्री करून उदरनिर्वाह करत होता. चतु:शृंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बालाजी पांढरे, पोलीस निरीक्षक अंकुश चिंतामण, उपनिरीक्षक अंगद नेमाणे, हवालदार सचिन कांबळे, सुहास पोतदार, सुधाकर माने, अस्लम अत्तार, गोकुळ घुले यांनी ही कामगिरी केली.

## साला शब्दावरून अर्थाचा अनर्थ ...

संशयकल्लोळ म्हणतो. केवळ ऐकीव माहितीवर संशय धरुन झालेल्या जबर मारहाणीत एकाचा मृत्यू झाल्याची घटना जळगाव जिल्ह्याच्या यावल तालुक्यातील रिधुरी या गावी घडली. जे कानांनी ऐकलेले असते ते खरेच असते असे नाही. एखाद्यावर आरोप करण्यापुर्वी त्या घटनेची सत्यता पडताळून बघणे गरजेचे असते. यावल तालुक्याच्या रिधुरी या गावी धनराज वासुदेव पाटील (सोनवणे) हा चाळीशीतील शेतकरी रहात होता. शेती, गुरे-ढोरे, गुराढोरांचा गोठा, शेणखत, दुध-दुभते, शेणाने सारवलेले अंगण या वैभवाच्या बळावर या तरुण शेतक-याचा प्रपंच सुरु होता. अस्सल ग्रामीण शेतक-याच्या घरादारात दिसून येणारा शेतीच्या साधनांसह गुराढोरांचा प्रपंच धनराज पाटील याच्याकडे दिसून येत होता. पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, आई-वडील या सर्वांचा धनी असलेला धनराज आपला संसार सुखाने करत होता. बोलून चालून मोकळा असलेला धनराज आपले जीवन आनंदाने व्यतीत करत असतांना का कुणास ठाऊक त्याच्या संसाराला नियतीची नजर लागली. भाऊबंदकीचा वाद त्याच्या जीवावर उठला. भाऊबंदकीचा वाद आणि कलहाने त्याच्या जीवनात एक क्षण असा आला की त्याला थेट जीवालाच मुकावे लागले. भाऊबंदकी जीवावर उठली म्हणजे कशा प्रकारे होत्याचे नव्हते होते ते या घटनेतून दिसून आले. धनराज सोनवणे रहात असलेल्या घरासमोर त्याच्या गुरांचा गोठा आहे. त्या ठिकाणी तो आपली गुरे बांधत होता. त्या गोठ्याला लागूनच त्याचा चुलत भाऊ सतिष सुखदेव सोनवणे याचा देखील गुरांचा गोठा आहे. धनराज आणि सतिष हे दोघे चुलत भाऊ शेजारी शेजारी रहात होते. दोघांच्या गुरांचा गोठा देखील शेजारी शेजारी आहे. साधारण सहा महिन्यांपुर्वी दोघा भावांमधे जागेच्या कारणावरुन वाद झाले होते. हा वाद थेट फैजपूर पोलिस स्टेशनपर्यंत गेला होता. धनराजची पत्नी सोनी हिने फैजपूर पोलिस स्टेशनला शेजारी राहणाऱ्या सतिष सोनवणे याच्याविरुद्ध तक्रार दाखल केली होती. तेव्हापासून दोघा परिवारामधे धुसफुस सुरु होती. १५ जानेवारी २०२४ रोजी सर्वत्र मकर संक्रांती या सणाची धामधुम सुरु होती. तिळगुळ घ्या आणी गोड बोला असे म्हणत घरोघरी उत्साहाचे वातावरण दिसून येत होते. ग्रामीण भागात हा सण आवर्जून साजरा केला जातो. मात्र या दिवशी धनराज सोनवणे यांच्या बाबतीत मात्र अघटीत झाले. या दिवशी सायंकाळी धनराज सोनवणे हा युवा शेतकरी त्याची पत्नी व दोघा मुलांसह गोठ्यात गुरांना चारापाणी घालत होता. त्यावेळी बाजुच्या गोठ्यात त्याचा चुलत भाऊ सतिष सोनवणे याची पत्नी आरती सोनवणे ही देखील हजर होती. त्यावेळी धनराज हा उमेश नावाच्या जेसीबी चालकासोबत बोलत होता. धनराज आणि उमेश या दोघांची एकमेकांसोबत घनिष्ठ मैत्री होती. त्यामुळे इकडून धनराज पलीकडच्या उमेश सोबत मोबाईलवर मनमोकळेपणे बोलत होता. दोघांमधे मोठ्या प्रमाणात चेष्टा मश्करी सुरु होती. इकडून धनराज त्याला मोबाईलवर बोलतांना साल्या या शब्दाचा वापर करत होता. खानदेशात मित्राला देखील गमतीने बोलतांना साल्या असे म्हणतात. त्यामुळे मोबाईलवर उमेश सोबत बोलतांना धनराज त्याला गमतीने साल्या असे म्हणत होता. साल्या हा शब्द त्याच्याकडून दोन तिन वेळा म्हटला गेला. त्यावेळी शेजारच्या गोठ्यात त्याचा चुलत भाऊ सतिष याची पत्नी आरती ही हजर होती. मोबाईलवर साल्या हा शब्द धनराज आपल्या पतीला उद्देशून म्हणत असल्याचा गैरसमज आरती सोनवणे हिचा झाला. अगोदरच दोघा परिवारांमधे जागेच्या वादावरुन धुसफुस सुरु होती. त्यातच काही महिन्यांपुर्वी हा वाद पोलिस स्टेशनपर्यंत गेला होता. त्यामुळे तीच्या रागाचा पारा चढला. साल्या हा शब्द तुम्ही माझ्या पतीला उद्देशून म्हणत असल्याचा तिने धनराज वर थेट आरोप करत शिवीगाळ सुरु केली. त्यावेळी धनराजची पत्नी सोनी हिने आरतीला समजावून सांगितले की उमेश नावाच्या जेसीबी मशिन चालकासोबत माझा पती बोलत होता. दोघांमधे मोबाईलवर थट्टा मश्करी सुरु होती. दोन महिलांमधे सुरु असलेल्या वादात आरतीचा पती सतिष सोनवणे याची एंट्री झाली. साल्या हा शब्द आपल्यालाच उद्देशून मोबाईलवर म्हटल्याचा त्याचा देखील गैरसमज झाला. मागचा पुढचा विचार न करता सतिष याने हातात लोखंडी पाईप आणला. तो लोखंडी पाईप त्याने सरळ धनराजच्या डोक्यात हाणला. लोखंडी पाईपाचा अचानक हल्ला झाल्याने धनराज थेट शेणखतात बेशुद्ध होऊन पडला. त्याच्या डोक्यातून रक्त वाहू लागले. त्याचवेळी सतिषचा भाऊ युवराज सुकदेव सोनवणे, युवराजचा मुलगा दिपक युवराज सोनवणे, मिना युवराज सोनवणे, यमुनाबाई सुकदेव सोनवणे असे सर्वजण त्याच्या दिशेने चाल करुन आले. त्यावेळी युवराज सोनवणे व दिपक सोनवणे या दोघांच्या हातात लाकडी काठया होत्या. बेशुद्ध आणि रक्तबंबाळ झालेल्या धनराजला त्याची पत्नी सोनी व दोन्ही मुले उचलण्याचा कसोशीने प्रयत्न करत होते. मात्र तिघांच्या मानसिक वेदनेकडे कुणीही लक्ष दिले नाही. युवराज सोनवणे व दिपक सोनवणे यांनी बेशुद्ध धनराजची पत्नी सोनी हिला देखील लाकडी काठयांनी मारहाण करु लागले. एवढे कमी झाले की काय म्हणून मिना, आरती, यमुनाबाई या तिघीजणी तिला चापटा बुक्यांनी मारहाण करत होते. धनराजची मुलगी वैष्णवी व मुलगा ओम या दोघांना देखील त्यांनी लाकडी काठयांनी, चापटाबुक्यांनी मारहाण सुरु केली. आपला मुलगा धनराज हा बेशुद्ध होऊन पडल्याचे बघून त्याचे वडील वासुदेव झावरु सोनवणे यांच्यासह विलास लौटू सोनवणे, भगवान सोनवणे, तुळशिराम शिवलाल सोनवणे तसेच गावातील इतर लोक घटनास्थळी जमा झाले. जमलेल्या लोकांनी धनराजसह त्याची पत्नी व मुलांची जमावाच्या तावडीतून कशिबशी सुटका केली. बेशुद्ध धनराज याला तातडीने रिक्षाने फैजपूर येथील डॉ. खाचणे यांच्या दवाखान्यात नेण्यात आले. डॉ. खाचणे यांनी त्याला तपासून मयत घोषित केले. त्यामुळे मयत धनराज यास यावल ग्रामीण रुग्णालयात उत्तरीय तपासणीकामी दाखल करण्यात आले. या घटनेप्रकरणी मयत धनराज सोनवणे याची पत्नी सोनी सोनवणे हिने दिलेल्या फिर्यादीनुसार फैजपूर पोलिस स्टेशनला एकुण सहा जणांविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. भाग ५ गु.र.न. ९/२०२४ भा.द.वि. ३०२, ३२४, ३२३, १४३, १४७, १४८, १४९, ५०४ नुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला. सतिष सुकदेव सोनवणे, युवराज सुकदेव सोनवणे, दिपक युवराज सोनवणे, आरती सतिष सोनवणे, मिना युवराज सोनवणे, यमुनाबाई सुकदेव सोनवणे (रा. रिधुरी ता. यावल) अशा सहा जणांविरुद्ध हा गुन्हा नोंद करण्यात आला. यापैकी सुरुवातीला सतिष सुकदेव सोनवणे, युवराज सुकदेव सोनवणे आणि दिपक युवराज सोनवणे या तिघांना अटक करण्यात आली. पोलिस उप निरीक्षक मैनुद्दीन सैय्यद यांनी दाखल गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

## पैशाच्या वादातून शिक्षकाचा खून...

निरीक्षक रणजितसिंह परदेशी हे तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी प्रा. नागेश सेनिगारापू हे बेडरूममध्ये दोन्ही हाताची मनगटं कापलेल्या अवस्थेत आढळून आल्याने पोलिसांनी या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली.काही अपरिहार्य कारणाने प्रा. नागेश सेनिगारापू यांनी आत्महत्या केली असावी असा कयास बांधून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली. विशेष म्हणजे कुटुंबालाही तेव्हा कुठलाही संशयास्पद प्रकार वाटला नाही. पोलिसांनी पंचनामा करून तो मृतदेह शवविच्छेदनसाठी रवाना केला. प्राथमिक शवविच्छेदन अहवालात प्रा. नागेश सेनिगारापू यांची आत्महत्या वाटत असली, तरी सेनिगारापू यांचा फोन गायब असल्याने पोलिसांना जरा संशय आला. त्यांच्या एका मनगटावर खोल वार झाला होता आणि दुसऱ्यावरची जखम तितकी खोल नसल्यामुळे ती आत्महत्या भासत होती. त्यामुळे पोलिसांचा संशय बळावला. अर्नाळा पोलिसांनी तपासला गती देऊन सेनिगारपूचा कॉल डेटा रेकॉर्ड (सीडीआर) मिळवला आणि अपार्टमेंट कॉम्प्लेक्सच्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. फुटेजमध्ये २१ जानेवारी रोजी संध्याकाळी साडेसात वाजताच्या सुमारास एक व्यक्ती इमारतीत शिरताना दिसला. काही तासांनंतर तो निघून गेला. इमारतीतील रहिवाशांना त्याची ओळख पटू शकली नाही किंवा सेनिगारापूचे कुटुंबही ओळखू शकले नाहीत. सीडीआरमध्ये असे दिसून आले आहे की सेनिगारापू हे अल्फरन खान नावाच्या एका व्यक्तीच्या संपर्कात होते. पोलिसांनी सापळा रचून त्याला मंगळवारी ओशिवरा येथून ताब्यात घेतले. त्याने खुनाची कबुली दिली. अल्फरन खान हा २२ वर्षाचा स्ट्रगलिंग अभिनेता. तो चित्रपट आणि टीव्ही इंडस्ट्रीमध्ये कामाच्या शोधात होता. त्याने मसाज थेरपिस्ट म्हणूनही नोकरी केली होती. गेल्या वर्षी अल्फरन खान आणि डॉ नागेश सेनिगारापू या दोघांची ऑनलाइन मैत्री झाली होती. त्यानंतर तो अनेक वेळा सेनिगारापू यांना भेटला. रविवारी २० जानेवारी रोजी प्रा. सेनिगारापू यांनी अल्फरन खान याला पहिल्यांदा घरी बोलावले. सायंकाळी ७.३० च्या दरम्यान तो घरी आला. त्याने सेनिगारापूंकडे काही पैशांची मागणी केली. मात्र प्रा. सेनिगारापू यांनी अल्फरन खान यास पैसे देण्यास नकार दिला.यावरुन त्यांच्यात वाद झाला आणि रागाच्या भरात अल्फरन खान याने स्वयंपाकघरातील चाकू वापरून सेनिगारापूंचे मनगट कापले आणि त्यांचा फोन घेऊन पळून गेला. अशी कबुली अल्फरन खान याने पोलिसांजवळ दिली. अर्नाळा पोलिसांनी या गुन्हयाचा तपास करून मंगळवारी संशयीत आरोपी अल्फरन खान याला अटक केली. प्रा.नागेश सेनिगारापू यांच्या खुनाला वाचा फोडली.

## अनैतिक संबंधाला विरोध केल्याने ...

आपले पती घरात रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. आपण त्यांना अंगणात आणलं. त्यांना दवाखान्यात घेऊन जायचं आहे असा कांगावा करत तिने गावात माहिती दिली. घराला बाहेरून कडी घालून घेतली आणि आपण काही केलेच नाही अशा अविर्भावात होती. या सगळ्या प्रकाराने ग्रामस्थांना संशय आल्याने त्यांनी तात्काळ पोलिसांकडे संपर्क केला. काही वेळातच पोलिस यंत्रणा डॉगस्कॉड सहित घटनास्थळी दाखल झाली. जवळच झाडाखाली पडलेल्या रक्त लागलेल्या काठ्या दिसल्या याचा वास डॉगस्कॉडला देण्यात आला. यावेळी डॉगस्कॉड या ठिकाणी असलेली शितल पडवळ आणि मनराज दत्ताराम चव्हाण यांच्या अंगावरच दोन-तीन वेळा गेल्याने या दोघांनीच हा सगळा बनाव रचल्याचे उघड झाले. याप्रकरणी संशयित पत्नी शितल पडवळ आणि पत्नीचा प्रियकर संशयित मनराज दत्ताराम चव्हाण यांना जयगड पोलिसांनी अटक केली आहे. जयगड येथे रहाणारे मयत सुरेश धोंडू पडवळ वय वर्ष ६४ राहणार नांदिवडे हे मोल मजुरीचे काम करायचे. पत्नी शितल पडवळ हिचा गावातच एक स्टॉल असल्याची माहिती पोलिस तपासात समोर आली आहे. यापूर्वीही असा जीवघेणा हल्ला पती सुरेश पडवळ यांच्यावर पत्नीने केला होता, अशी माहिती आता तपासात समोर आली आहे. मात्र, त्याच वेळेला त्यांची पत्नी शितल सुरेश पडवळ आणि तिचा प्रियकर मनराज दत्ताराम चव्हाण यांचे प्रेम संबंध असल्याचा संशय त्यांच्या पतीला होता यावरून घरात सातत्याने भांडण सुरू होती. याच रागात शितल पडवळने निर्दयीपणे खून करत सुरेश पडवळ यांचा काटा काढल्याची प्राथमिक माहिती पोलिस तपासात समोर आली आहे. जयगड पोलिसांनी संशयित आरोपी शितल पडवळ आणि मनराज दत्ताराम चव्हाण (मु. नांदिवडे भंडारवाडा) यांना ताब्यात घेतले असून या दोन्ही नराधमांवर भा.द. वि. क ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. जयगड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक कुलदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक क्रांती पाटील, जयगड पोलिस ठाण्याचे पोलिस कर्मचारी अधिक तपास करत आहेत.

# भिवंडीत बनावट जिरे बनवून विक्री करणाऱ्या दोघांना अटक

## ● तब्बल सात लाख किमतीचे ७ टन बनावट जिरे हस्तगत
## ● पालघर येथील फॅक्टरीत बनवले जात होते बनावट जिरे



**भिवंडी/प्रतिनिधी**

बनावट जिरे बनवुन तो हॉटेल, कॅटरर्स यांना घाऊक विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात शांतीनगर पोलिसांना यश आले असून त्यांनी केलेल्या कारवाईत दोघा जणांना ताब्यात घेत त्यांच्या जवळून ७ लाख १९ हजार ७०० रुपये किमतीचा लाकडाच्या भुस्या पासून बनवलेला ७ टन बनावट जिरा व ४ लाख रुपये किमतीचा बोलेरो पिकअप टेम्पो असा एकूण सव्वा अकरा लाखांचा मुद्देमाल जप्त करीत पालघर येथील ३० लाख रुपये किमतीची फॅक्टरी मधील यंत्रसामुग्री व कच्चा माल जप्त केला आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहिती नुसार भिवंडी शहरातील शांतीनगर पोलीस ठाणे हददीत दोन व्यक्ती लाखो रुपये किमतीचा बनावट जिरे विक्री करण्या साठी येणार असल्याची गुप्त माहीती पोलिस उपनिरीक्षक सुरेश घुगे व त्यांच्या तपास पथकातील पोलिस शिपाई क्षिरसागर यांना मिळाली होती. माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर इंदलकर यांना दिली. गुप्त बातमीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस उपायुक्त नवनाथ ढवळे सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर खैरनार यांचे मार्गदर्शन घेऊन पोलिस उप निरीक्षक सुरेश घुगे, पोलिस नाईक किरण जाधव, श्रीकांत पाटील, पोलिस शिपाई नरसिंग क्षिरसागर, रवि पाटील, तौफीक शिकलगार यांचे पोलिस पथकासह अन्न सुरक्षा अधिकारी इंद्रजीत चिलवते यांच्या सोबतीने गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहिती नुसार नागाव फातमा नगर येथील नव्वद फुट रोड येथे सापळा लावला. संशयीत टेम्पो त्याठिकाणी येताच पोलिसांनी टेम्पो अडवून टेम्पोतील मालाची तपासणी अन्न सुरक्षा अधिकारी यांनी केली असता सदरचे जिरे लाकडाचे भुशाला वेगवेगळे रासायनिक पावडर चे कोटिंग करुन बनविलेले आढळुन आले. तर जिरे पाण्यात टाकुन पाहीले असता ते पुर्णपणे विरघळुन त्यांचे काळे रंगाचे पाणी तयार झाले.जिरे माल हा बनावट असल्याची खात्री झाल्याने अन्न सुरक्षा अधिकारी इंद्रजीत चिलवते यांच्या तक्रार वरून पोलिसांनी टेम्पो चालक शादाब इस्लाम खान वय ३३ वर्ष रा.नवलीफाटा पालघर पश्चिम व चेतन रमेशभाई गांधी वय ३४ वर्षे, डहाणुकर वाडी कांदीवली पश्चिम यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली.तर टेम्पो मधील ८० गोण्या मधील २३९९ किलो वजनाचा बनावट जिरे साठा जप्त केला.

दोघा आरोपींच्या मुसक्या आवळून पोलिसी खक्या दाखवित चौकशी केली असता चेतन रमेशभाई गांधी याने पालघर जिल्ह्यातील नंडोरे येथील नोव्हेल इडस्ट्रियल इस्टेट येथील आपल्या जागृती एन्टरप्रायजेस येथे शासना कडून कोणताही नोंदणी परवाना न घेता बनावट जिऱ्याची फॅक्टरी चालु केली होती.त्या फॅक्टरीत बनावट जिरे तयार केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने पोलिसांनी फॅक्टरीतुन बनावट जिरा व बनावट जिरा बनवण्यासाठी लागणारे वेगवेगळ्या रंगाच्या रासायनिक पावडर असा ३० लाख रुपये किंमतीचे साहीत्य जप्त करुन फॅक्टरी सिलबंद केली आहे. जीरा राईस हा हॉटेल मधील जेवणातील अविभाज्य डिश त्यामुळे हॉटेल कॅटरर्स या ठिकाणी जिऱ्यास मोठी मागणी असल्याने बडीशोपच्या टोकाकडील कच्चा माल घेऊन त्यास रंग प्रक्रिया करून बनावट जिरा बनवून खऱ्या जिऱ्या मध्ये मिसळून पॅरोट ब्रँड ने त्याची पॅकिंग करून एपीएमसी मार्केट यांसह ठाणे पालघर मुंबई गुजरात या भागात घाऊक भावाने हॉटेल, कॅटरर्स यांना विक्री केला जात होता अशी माहिती पोलिस उपायुक्त नवनाथ ढवळे यांनी दिली आहे. त्यामुळे या पुढे हॉटेल मध्ये जिरा राईस खाताना अनेकांच्या भुवया उंचावणार एवढे नक्की.

# अशोक जैन यांचे हस्ते लुपिन डायग्नोस्टिक्स लॅबचे उद्घाटन



**जळगाव/प्रतिनिधी**

जळगाव शहरात अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त लुपिन डायग्नोस्टिक्स लॅबचे उद्घाटन जैन उद्योग समूहाचे अध्यक्ष अशोक जैन यांच्या हस्ते दि २६ जानेवारी २०२४ रोजी करण्यात आले. रुग्णांना आपल्या उपचारासाठी कुठलीही दिरंगाई होऊ नये व त्यांना आपल्या विविध वैद्यकीय चाचण्या शहरातच उपलब्ध व्हाव्यात या अनुषंगाने या लॅबची शहरात उभारणी करण्यात आल्याचे तन्वीर पटेल यांनी सांगितले. आधी अनेक वेळा रुग्णांचे नमुने मुंबई, पुणे, नाशिक यासारख्या शहरात पाठवावे लागायचे त्यामुळे रिपोर्टसाठी रुग्णांना व नातेवाईकांना दोन तीन दिवस वाट पाहत बसावी लागायची, मात्र आता अवघ्या दोन तासात सर्व रिपोर्ट मिळणे शक्य होईल, ज्यामुळे रुग्णांना आपल्या आजाराचे निदान व उपचार करण्यासाठी वेळ लागणार नाही. लुपिन डायग्नोस्टिक्स या अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त लॅबच्या उद्घाटना प्रसंगी जैन उद्योग समूहाचे अध्यक्ष अशोक जैन यांनी फित कापून उद्घाटन केले. यावेळी त्यांच्यासोबत डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी हे देखील उपस्थित होते. अशोक जैन यांनी लॅबच्या कार्याबाबत व तंत्रज्ञानाबाबत अधिक माहिती जाणून घेतली त्यांना मयूर सूर्यवंशी यांनी संपूर्ण कार्यप्रणाली बद्दल माहिती दिली. दरम्यान अशोक जैन यांनी तेथील कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. ते म्हणाले, तुमच्या प्रयत्नांमुळे शहरातील वैद्यकीय क्षेत्राला नक्कीच गती मिळेल, आणि अनेकांना त्याचा लाभ होईल. रुग्णांचा व डॉक्टरांचा यामुळे मौल्यवान वेळ वाचेल. आणि अनेकांना योग्यवेळी योग्य तो उपचार मिळेल. यावेळी लुपिन डायग्नोस्टिक्स चे सेल्स मॅनेजर योगेश परजणे यांनी अशोक जैन यांचे स्वागत केले, तर एरिया सेल्स मॅनेजर सागर शेलार यांनी डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी यांचे स्वागत केले. उद्घाटना वेळी लुपिन डायग्नोस्टिक्स च्या डॉ. रेणुका इथापे, योगेश परजणे, सागर शेलार, तन्वीर पटेल, विजय बोरणारे, केतन सोनवणे, प्रेम सोनार उपस्थित होते.

# माझी बदनामी हा विरोधकांचा डाव -दयानंद चोरघे



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी लोकसभा काँग्रेससाठी पोषक असून हि जागा शंभर टक्के काँग्रेस जिंकणार असल्याची शक्यता असून त्यासाठी काँग्रेसच्या कोकण प्रांत मेळाव्याचे आयोजन भिवंडीत करण्यात आले होते.या सर्व मेळाव्याचा सर्व खर्च मी स्वतः केला असून २०१४ साली राहुल गांधी यांच्या सभेचा सर्व खर्च देखील मी स्वतः केला होता. मेळाव्यांचाच खर्च नव्हे तर संपूर्ण निवडणुकांचा खर्च करण्यास देखील मी सक्षम व समर्थ आहे मात्र काही विरोधकांनी माझी बदनामी करण्यासाठी माझ्या विरोधात बातम्या पेरण्याचे काम सुरु केले आहे.असा खुलासा काँग्रेसचे ठाणे जिल्हा ग्रामीणचे अध्यक्ष दयानंद चोरघे यांनी शुक्रवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला आहे. भिवंडी लोकसभा मतदार संघात काँग्रेसचा कोकण विभागीय जिल्हास्तरीय कार्यकर्ता मेळावा बुधवारी भिवंडीत पार पडला. या मेळाव्याला काँग्रेसचे प्रदेश प्रभारी काँग्रेसचे प्रदेश प्रभारी रमेश चैन्नीथाल, प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विरोधीपक्ष नेते विजय वड्डुटीवार, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आरिफ नसीम खान, चंद्रकांत हांडोर, भालचंद्र मुणगेकर, हुसेन दलवाई यांसह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. यावेळी भिवंडी लोकसभा काँग्रेस लढेल असा विश्वास प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी कार्यकर्त्यांसमोर व्यक्त केला. मात्र विरोधकांना माझी भीती वाटत असल्याने विरोधकांनी माझ्या विरोधात कारस्थान करण्यास सुरुवात केली आहे.मात्र मी स्वतः सक्षम असून भिवंडी लोकसभा काँग्रेस शंभर टक्के लढणार व जिंकणार असा दावा देखील चोरघे यांनी या पत्रकार परिषदेत केला.

# औद्योगिक प्रशिक्षण संस्था वाडा येथे उद्योग बैठक संपन्न

**वाडा/प्रतिनिधी**

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वाडा येथे सिमेन्स आणि टाटा स्ट्राईव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने पालघर जिल्ह्यातील उद्योगांची बैठक संपन्न झाली. जिल्ह्यातील सर्व दहा शासकीय आयटीआयच्या अधिकाऱ्यांसोबत जिल्ह्यातील उद्योगांचे अधिकारी यांनी आवश्यक कौशल्यपूर्ण मनुष्यबळ पुरवणेबाबत चर्चा केली. आदिवासी भागातील प्रशिक्षणार्थ्यांना उद्योगांमध्ये प्रशिक्षण कार्यानुभव मिळावा याकरीता जर्मनीप्रमाणे द्विस्तर व्यवसायिक शिक्षण व प्रशिक्षण योजना राबवणे करीता सदर बैठकीचे आयोजन केले होते. उद्योगांमध्ये काम करण्याचा अनुभव प्रशिक्षणार्थ्याला शिक्षण घेत असताना मिळाल्यास त्याचा कामाकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होईल आणि उद्योगास त्याचा फायदा होईल, असे प्रतिपादन या योजनेचे प्रवर्तक अभय रावुळ यांनी केला. औद्योगिक आस्थापना आणि प्रशिक्षण संस्था यांनी आपापले प्रश्न मांडावेत आणि त्यावर योग्य ते उत्तर शोधून उत्तम दर्जाचे प्रशिक्षण कसे देता येईल आणि त्याकरिता शासकीय



यंत्रणा कशी मदत करू शकेल यावर या बैठकीचे आयोजक वाडा संस्थेचे प्राचार्य रोहन चुंबळे यांनी प्रकाश टाकला. लेखी स्वरूपात मांडल्यास उद्योगांना आवश्यक असलेले व्यवसायिक शिक्षण शासकीय यंत्रणा नक्की पुरवेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. या योजनेत प्रशिक्षणार्थ्याला येणाऱ्या अडचणी वरती इंडस्ट्री आणि इन्स्टिट्यूट यांनी एकत्र येऊन मात करणे आवश्यक आहे. त्यानेच प्रशिक्षणार्थ्यांचे भवितव्य घडेल असे प्रतिपादन जव्हार संस्थेचे प्राचार्य श्याम आंबळकर यांनी केले. या बैठकी करता जिल्ह्यातील वीस पेक्षा अधिक औद्योगिक आस्थापना उपस्थित होत्या. उद्योगांच्या वतीने ब्लू स्टार कंपनीच्या वरिष्ठ व्यवस्थापक शास्त्री यांनी प्रशिक्षणार्थ्यांना तांत्रिक ज्ञान, सुरक्षेची माहिती, संवाद कौशल्य, उत्पादन व्यवस्थापन, देखभाल - दुरुस्ती इत्यादी बाबींची व्यवस्थित माहिती असावी अशी अपेक्षा व्यक्त केली. एस जी हेवी इंजिनिअरिंगचे अतुल देशपांडे यांनी प्रशिक्षनार्थी यांना आस्थापना भेटी देण्याची तसेच नवीन तंत्रज्ञानवर आधारित विषयांची माहिती देवू, असे सांगितले. आमच्या स्थापनेत महिलांना अधिक संधी उपलब्ध करून दिली जाईल, अशी माहिती प्राज इण्डस्ट्रीच्या श्रीम. ग्रिंझेल यांनी दिली. इतर आस्थापना अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत योजनेत सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली. या बैठकीला यशस्वी करणेकरीता टाटा स्त्राईवचे जयेश पवार, अक्षय अजाणकर, शंकर पंडीत यांनी तर आयटीआयचे किरण सोनवणे, पंडीत बावके, शिवाजी निकम, पंडीत पाटील आणि विविध प्रशिक्षणार्थी यांनी मेहनत घेतली.

# समता नगर दोन येथे प्रवेशदार व सार्वजनिक शौचालयाचे नूतनीकरण



**अंबरनाथ/सुनील तांबे**

उल्हासनगर नं. ५ परिसरातील समतानगर दोन या वस्तीमध्ये वस्तीचे प्रवेशद्वार व दोन जुन्या मोडकळी झालेल्या सार्वजनिक शौचालयाचे भूमिपूजन. बरेच दिवसापासून प्रलंबित असलेले काम समता नगर रहिवासी यांनी मा.नगरसेवक व तातकालीन उद्धव ठाकरे गटाचे अंबरनाथ विधानसभा विभाग प्रमुख राजेश वानखेडे यांच्या कडे कागदोपत्री (लेखी) मागणी केली होती. मागणीला पाठपुरावा करून राजेश वानखेडे यांनी दोन्ही कामे टेंडर पास करून घेतले, आणि आज रोजी माजी नगरसेवक राजेश वानखेडे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले आहे. या प्रसंगी हे दोन्ही कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल असे सांगितले.या वेळेस समता नगर क्रमांक दोन वसाहतीतील असंख्य जेष्ठ महिला व ज्येष्ठ पुरुष उपस्थित होते.या प्रसंगी समतानगर मधील परशुराम मनवर, प्रेम भाव वृत्त पत्राचे संपादक देवानंद पाढेन, रमेश शेळके, पप्पू गायकवाड, अज्जू अन्सारी, राजेश शेळके, शकील खान, रत्नपाल उके, मंगेश बोरकर, पत्रकार रमेश कांबळे, हरिभाऊ तायडे, रवींद्र नगराळे, अतुल मनवर, सरदार साहेब,प्रभाताई मनवर, मोनाताई गवई, रंगमा अंट्टी, शिंगोडे ताई,वेणूताई शेळके, नलिनी गवई, उज्वला उके, सुरेखा पाटील इत्यादी समातानगर वसाहतितील नागरिक उपस्थित होते.

# गुण दर्शन समुहगान स्पर्धेत जिल्हा करंजपाडा शाळेचा प्रथम क्रमांक

**वाडा/प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या जिल्हास्तरीय विविध गुणधर्म स्पर्धा मंगळवारी आनंद आश्रम इंग्लिश हायस्कूल, पालघर येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. या कार्यक्रमा प्रसंगी जिल्हा परिषद सदस्य पंकज कोरे, पालघर जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी भानुदास पालवे, शिक्षणाधिकारी संगीता भागवत, क्रीडा समन्वयक तथा उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद पालघर आनंद आश्रम इंग्लिश हायस्कूलचे प्राचार्य, आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. या स्पर्धेमध्ये वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा, वसई, तलासरी, डहाणू अशा आठही तालुक्यातील स्पर्धकांनी सहभाग घेतलेला होता. समूहगान लहानगट मोठागट १६, स्पर्धक तसेच नाट्य स्पर्धेसाठी ८ स्पर्धक, वादविवादात स्पर्धेसाठी- १६ स्पर्धक, शैक्षणिक साहित्यनिर्मिती ८ स्पर्धक समाविष्ट झालेले होते. मान्यवरांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देऊन त्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने ही स्पर्धा आयोजित केली जाते. मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून शुभेच्छापर संदेश देऊन स्पर्धा सुरू करण्यात आली. स्पर्धाअतिशय रोमांचकारी आणि स्पर्धात्मक दृष्टीने पार पडली या स्पर्धेसाठी दिग्गज असे त्या त्या क्षेत्रातील




पारंगत परीक्षक लाभलेले होते. या स्पर्धेमधून लहान गटातील समूहगान स्पर्धेमध्ये वाडा तालुक्यातील हमरापुर केंद्रातील जिल्हा परिषद शाळा करंजपाडा या शाळेने प्रथम क्रमांक पटकावला या स्पर्धेमध्ये यशाची विजयी पताका लहरविण्यासाठी करंजपाडा शाळेच्या मुख्याध्यापिका शर्मिला शंकर दळवी, हमरापुर केंद्राचे केंद्रप्रमुख माननीय संजय हरिचंद्र पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले, तसेच शाळेचे सहशिक्षक दिपक नवसू शनवारे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शिवाजी पांडुरंग भोईर, अविनाश सखाराम सांबरे तसेच गालतरे इस्कॉनच्या स्वयंसेवी ज्योतिका गायकर आणि संपूर्ण करंजपाडा माता पालक, ग्रामस्थ व नवतरुण मित्र मंडळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी अनोखा शास्त्रीय गायनाचे व वादनाची तयारी शाळेचे सहशिक्षक दिपक नवसू शनवारे यांनी करून घेतलेली होती या स्पर्धेमध्ये यश मिळविल्यामुळे मान्यवरांकडून, प्रशासनाकडून ग्रामस्थांकडून अभिनंदन व कौतुकाची थाप मिळत आहे. करंजपाडा या गावाचा व शाळेचा इतिहास तसा खूप अभूतपूर्व आहे. त्यामध्ये आणखी एका प्रसंगाने भर पडली. याचा आनंद समस्त ग्रामस्थांना झालेला आहे. त्यासाठी ग्रुप ग्रामपंचायत हमरापुर क्षेत्रामधील वस्तीमध्ये ग्रामस्थांना होत आहे, हा आनंदोस्तव साजरा करण्यासाठी मार्गदर्शक शिक्षक व सहभागी विद्यार्थ्यांची विजयी शोभायात्रा काढण्यात आली.

# आदिवासी युवकांनी ऑटोमोबाईल प्रशिक्षणासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**पालघर/प्रतिनिधी**

अनुसचित जमातीच्या दारिद्य रेषेखालील आदिवासी युवकांना ऑटोमोबाईल प्रशिक्षण देणे या योजनेसाठी प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,जव्हार ता.जव्हार जि.पालघर अतर्गत जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा या चार तालुक्यातील दारिद्य रेषेखालील अनुसुचित जमातीच्या लाभार्थ्यांचे अर्ज मागविण्यात येत आहेत. लाभार्थ्यांनी कागदपत्रांसह या कार्यालयात दि.२४ जानेवारी पर्यन्त विहीत नमुन्यात अर्ज सादर करावे. सदर योजनेच्या अटी व शर्ती तसेच कागदपत्रांबाबत तपशिल पुढीलप्रमाणे : लाभार्थी हा अनुसुचित जमातीचाच असावा त्यांच्याकडे स्वतःचा जातीचा दाखला असावा, लाभार्थी यांनी दारिद्र रेषेचा दाखला जोडेणे आवश्यक आहे, अपंग लाभार्थ्यांना ३ टक्के आरक्षणानुसार प्राधान्य देण्यात येईल, लाभार्थी इ.८ वी पास असने आवश्यक आहे, लाभार्थ्याने यापुर्वी या कार्यालयाकडुन सदर योजनेचा लाभ घेतलेला नसावा, लाभार्थ्यांचा रहीवाशी दाखला असावा, अर्जदाराच्या नावे ग्रामसभेचा ठराव व नाहरकत दाखला असणे आवश्यक आहे, लाभार्थ्याचे आधारकार्ड, रेशनकार्डच्या छायाप्रती अर्जासोबत सादर कराव्या, अर्जासोबत अलीकडे काढलेले २ पासपोर्ट आकाराचे फोटो जोडण्यात यावेत, अंतिम लामार्थी निवडीबाबतचे व योजनेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, जव्हार यांनी सर्व अधिकार राखुन ठेवण्यात आले आहेत, विहीत नमुन्यात अर्ज कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत, लाभार्थी शासन नियमानुसार प्रशिक्षण पूर्ण करण्यास इच्छुक असावा, प्रशिक्षण हे अनिवासी याबाबतचे अधिकार सनियंत्रण व मुल्यमापन समितीने राखुन ठेवलेले आहेत.

# कोकण भवनात नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरेंच्या जयंती निमित्त अभिवादन




**नवी मुंबई/प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र लढयातील अग्रणी सेनानी आणि महान नेते नेताजी सुभाषचंद्र बोस आणि हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती निमित्त आज त्यांच्या प्रतिमेस पुष्पअर्पण करुन कोकणभवन येथे अभिवादन करण्यात आले. यावेळी कोकणभवनातील अधिकारी कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. स्वातंत्र्यवीर सुभाषचंद्र बोस यांनी दुसरे महायुध्द सुरु असतांना इंग्रजांशी लढण्यासाठी जपानच्या मदतीने आझाद हिंद फौज स्थापन केली होती. त्यांनी दिलेला तुम मुझे खून दो, मै तुम्हे आझादी दूंगा चा नारा हा भारताचा राष्ट्रीय नारा बनला. व्यंगचित्रकार असलेल्या हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसांच्या अस्मितेवर शिवसेना पक्षाची स्थापना करत राज्याच्या राजकारणात अल्पवधीतच दबदबा निर्माण केला. त्यांनी हिंदुत्वाच्या मुद्देवर राजकारणाला वेगळे वळण दिले.

# वाड्यातील मांगाठणे येथील तीन घरे जळून खाक

**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील मांगाठणे गावातील तलाठी पाड्यावरील तीन घरांना अचानक आग लागल्याने मोठे नुकसान झाले आले. गुरुवारी सकाळच्या सुमारास शॉर्ट सर्किट मुळे लागलेल्या आगीत प्रवीण बाळाराम जाधव, उषा बाळाराम जाधव व महेश गुरुनाथ वाघे यांची घरे जळून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. घरासमोर उभ्या असलेल्या दुचाकिसह तिन्ही घरातील कपडे, महत्वाचे कागदपत्रे, अन्नधन्या, सोन्याचे दागिने,रोख रक्कम व इतर संसारोपयोगी वस्तू आगीत भस्मसात झाली असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान शेजारी व गावाकऱ्यांनी पाण्याचा टँकर आणून आग विझविण्याचा आटोकात प्रयत्न केला मात्र आगीने रौद्ररूप धारण केल्याने अगदी कमी वेळेत मोठे नुकसान झाले आहे. मोलमजुरी करून आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह भागवणाऱ्या या परिवाराचा संसार उघड्यावर पडला आहे. या जळीतकांडाची माहिती मिळताच वाडा महसूल विभागाच्या अधिकारी व



कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असल्याचे समजले, आता प्रतीक्षा आहे ती या कुटुंबाना मिळणाऱ्या मदतीची.

29 JANUARY TO 04 FEBRUARY 2024 - Page 4 (CRIME SANDHYA)_Layout 1 27-01-2024 22:15 Page 1



# जातीयवादी समाजकंटक आणि हतबल सरकार!

अमन और भाईचारे पर
धरम का आतंक छाया हैं!
कब तक सहेंगे अंध भक्ता ेंका जुल्म्
अब ईन्हे ठिकाणे लगाने का वक्त आया है!

भारतात लोकशाही आहे आणि लोकशाही संविधानावर चालते. परंतु आज मात्र लोकशाही आणि संविधान दोन्ही धोक्यात आलेली आहे. परिणामी या देशात शांततेने जगणाऱ्या लोकांसमोर एक मोठे आव्हान उभे ठाकले आहे आणि हे आवाहन आहे धर्म, जात, आस्था आणि अंधभक्तीचे! संविधानात धार्मिक स्वातंत्र्य दिलेले आहे. पण याचा अर्थ असा नाही, की कुठल्याही धर्माच्या लोकांनी रस्त्यावर उतरून धर्माच्या नावाखाली लोकांचे जिने हराम करावे. तुम्ही, तुमचा धर्म, तुमच्या आस्था तुमच्या घरात किंवा मंदिरात ठेवा. रस्त्यावर या सगळ्या गोष्टींचा बाजार मांडून शांततेने जीवन जगणाऱ्या लोकांचे त्रास देऊ नका. असे आज या देशातील बहुसंख्य लोकांचे म्हणणे आहे. दुर्दैवाने या देशात कुठल्याही पक्षाचे सरकार असो, त्यांना धर्म, देव आणि आस्थेच्या कुबड्या घेतल्याशिवाय चालता येत नाही. ही त्यांची मजबुरी आहे. त्यामुळे धर्माच्या नावाखाली जे समाजकंटक रस्त्यावर उतरून हैदोस घालतात, त्यांचे फावलेले आहे. १९९२ साली बाबरी मशीद पाडल्यानंतर ज्या समाजकंटकांनी रस्त्यावर उतरून हैदोस घातला आणि निरपराध लोकांच्या हत्या केल्या, त्यानंतर सरकारने असे प्रकार रोखण्यासाठी कोणत्याही हाल-चाली केल्या नाहीत. किंवा कायद्यात आवश्यक ते बदल केले नाहीत. त्याचा परिणाम असा झाला की आजही धार्मिक मिरवणुकांवर दगडफेक केल्या जात आहेत. धार्मिक मिरवणुकांमध्ये जातीयवादी घोषणा दिल्या जात आहेत. नेते मंडळी चितावणीखोर फाशणे देऊन लोकांना भडकवत आहेत. परिणामी वातावरण तणावपूर्ण बनलेले आहे. या तणावाचा सर्वाधिक त्रास शांततेने जीवन जगणाऱ्या लोकांना होतो. हा त्रास त्यांनी आणखी किती दिवस सहन करायचा? काही दिवसांपूर्वीच अयोध्येत रामललाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने देशभर मिरवणुका निघाल्या. मीरा रोडमध्ये अशाच एका मिरवणुकीवर काही समाजकटकांनी दगडफेक केली. वास्तविक हा प्रकार अत्यंत निंदनीय होता. कारण अशाच घटनांमधून जातीय दंगली उसळतात. मात्र मिरा रोडची घटना घडल्यानंतर पोलिसांनी केवळ या घटनेला जबाबदार असलेल्या लोकांना अटक करण्याच्या पलीकडे काही केले नाही. जर पोलिसांनी त्यावेळेला त्यांना चांगले फटकावले असते. अगदी मरेपर्यंत चोप दिला असता किंवा लॉकअपमध्ये बंद केल्यानंतर पोलीस ही त्यांच्यावर तुटून पडले असते. त्यांना प्रचंड मार दिला असता. तर भविष्यात अशा घटनाना आळा बसला असता. कारण अशा लोकांना केवळ अटक होते. त्यांच्यावर गुन्हे दाखल होतात आणि त्यानंतर न्यायालयातून त्यांना जामीन मिळतो. जातीय दंगलीमध्ये पकडलेल्या गुन्हेगारांना किमान सहा महिने तरी जामीन मिळणार नाही अशा पद्धतीची कायद्यात तरतूद व्हायला हवी. तरच जातीय गुन्हेगारांना वचक बसेल. दुसरी गोष्ट एका समाजाने दुसऱ्या समाजाच्या धार्मिक स्थळांवर अधिकार सांगणे आणि त्यातून वादाला खतपाणी घालते हे सुद्धा काही बरोबर नाही. कशासाठी हे सगळं चाललेलं आहे. अशा गोष्टींना संविधानात थारा नाही. अशा गोष्टी मुळेच लोकांच्या धार्मिक भावना भडकतात आणि त्यातून मग जातीय दंगली घडतात. त्यामुळे हे कुठेतरी थांबायला हवे. कारण जे मिरा रोडमधे घडले ते देशाच्या इतर भागातही घडू शकते आणि घडले आहे. महाराष्ट्रात काही महिन्यांपूर्वी अशाच घटना घडल्या होत्या आणि त्यातून १९९२ सारखी परिस्थिती निर्माण झाली होती. हा देश सर्व जाती धर्माच्या लोकांचा आहे. कारण प्रत्येक जाती धर्माच्या लोकांनी या स्वातंत्र्यासाठी रक्त सांडलेली आहे. पण २०१४ नंतर या देशात अशी काही परिस्थिती निर्माण झाली की, हिंदुत्ववादी लोकांनी इतर धर्मियांच्या अस्तित्वालाच सुरुंग लावण्याचा प्रयत्न केला. काही दिवसांपूर्वी आयोजित राम लल्लाच्या प्राणप्रतिष्ठेचा भव्य सोहळा पार पडला. या सोहळ्याला या देशातील कुठल्याही इतर धर्मीयांनी विरोध दर्शवला नाही. उलट या सोहळ्या बाबत आनंदच व्यक्त केला. इतर धर्मियांचे या देशातील हिंदू धर्मियांबरोबर अत्यंत चांगलं संबंध असताना विनाकारण अल्पसंख्यांकांना दाबण्याचा किंवा दबावाखाली ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. धर्मस्थान कोणतेही असो ते जर जातीय दंगलीचा विषय ठरणार असेल, तर अशा धर्मस्थानाबाबत सरकारने निश्चितपणे काहीतरी ठोस धोरण अवलंबले पाहिजे. मोठ्या शहरांमध्ये ज्या ज्या ठिकाणी रस्ता रुंदीकरणाच्या आड किंवा इतर विकास कामाच्या आड येणाऱ्या धार्मिक स्थळांना पाढण्यात आले. परंतु हे करताना काही समाजकंटक मुद्दामहून लोकांच्या भावना भडकवतात आणि जातीय दगली सारखी स्थिती निर्माण करतात. सरकारने अशा समाज घटकांना शोधून काढणे गरजेचे आहे. मीरा रोड मध्ये मिरवणुकीवर दगडफेक करणारे हे असेच कोणीतरी समाजकंटक होते. आतापर्यंत ६४ लोकांना ताब्यात घेण्यात आले. पण त्यांच्या मागे जे कोणी सूत्रधार आहेत त्यांना पहिल्यांदा अटक व्हायला हवी. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जे लोक सत्तेत आहेत, त्यांनी अत्यंत संयमाने वागायला हवे. इतर धर्माच्या लोकांचे रक्षण करायला हवे त्यांच्याही धर्माबाबत आदर दाखवायला हवा. आपल्या पक्षाच्या लोकांना इतर धर्मियांना त्रास देऊ नका याबाबत आग्रहाने सांगायला हवे. परंतु सत्तेतले लोक आजकाल इतके मुजोर झाले आहेत की, त्यांना इतर धर्मीयांचे अस्तित्वच मान्य नाही हे भयंकर आहे. लोकशाहीच्या दृष्टीने हे जर असंच चालू राहिलं तर मीरा रोड सारख्या घटना सातत्याने घडत राहतील. आणि या ठिकाणी धार्मिक विद्वेशाचे वातावरण निर्माण होऊन देशाच्या एकाला सुरुंग लागेल. देश पुन्हा एकदा दुसऱ्या फाळणीच्या उंबरठ्यावर उभा राहील. म्हणूनच या देशाचे स्वातंत्र्य अबाधित राखायचे असेल, तर धार्मिक दंगली घडवणारे जे कोणी समाजकंटक आहेत, मग ते कुठल्याही जातीचे अथवा कुठल्याही धर्माच्या असोत, कुठल्याही पक्षाचे असोत त्यांचा जराही मुलांचा न ठेवता, त्याच्यावर कठोर कारवाई करायला हवी. धार्मिक द्वेषातून घडलेली प्रत्येक घटना आणि त्यातील आरोपी यांच्यावर अजामिन पात्र गुन्हे दाखल करायला हवेत ते कमीत कमी वर्षभर तुरुंगात राहिले तरच त्यांना अद्दल घडेल. या देशात देव भक्त असणे यात गैर नाही, पण आस्था आणि अंधभक्तीचे प्रदर्शन करून इतरांचे जिने हराम करणे चुकीचे आहे. एखादी गोष्ट समजून न घेता केवळ हल्लाबोल करणे दुसऱ्या धर्मीयांना त्रास देणे असे सगळे प्रकार भयंकर आहेत. म्हणूनच अशा लोकांविरुद्ध जर कठोर कायदा आणला तर भविष्यात मिरा रोड सारख्या घटना पुन्हा घडणार नाहीत.

# शेतीला जर आश्रय, तर शेतकऱ्याला राजाश्रय का नाही?



शेतीला जरी दिवस चांगले येत आहे असे वाटत असेल, तरी मात्र शेतकऱ्यांची अवस्था, त्याच्या दुःखाच्या कहाण्या सांगण्यातच एकमेकांची हयात गेली. त्या दुःखातून त्याला सावरण्याचे कोणत्याही राजकीय पक्षाने प्रयत्न केले नाही, तर उलट दुःखाच्या कथा सांगून राजकीय सत्ता पदरात पाडून घेतली, एवढेच काय राजकीय शक्तीचे भाग्य. वास्तविक पाहता पक्षप्रतिनिधींना आर्थिक दृष्टिकोन व, शेतकरी धोरणाचा अभ्यास सुद्धा नाही? दुःखाची मलमपट्टी करून मते मिळवून, मी कसा नेता होईल हेच विषय राजकीय पक्षांनी डोळ्यासमोर ठेवले. आणि त्याचा पुरेपूर फायदा घेऊन राजनीति तयार झाली. लोकांना मदत केल्याने मते मीळतात, व लोकांना गुलाम, लाचार ठेवले म्हणजे आपण नेते होतो, ही एक मोठी संकल्पना देशपातळीवर तयार झाली. शेतकऱ्याच्या समोर रडायचं आणि आपला उल्लू शिधा करायचा, हे सोपं गणित आमदार, खासदारांनी अमलात आणले. तरी मात्र तो शेतकरी मोठ्या मनाचा असून आपल्या घरातल पिकवीलेलं धान्य सर्वांना वाटत सुटला, अन् सर्वांचा पोशिंदा झाला. पण या दुःखातून त्याला दुरुस्त करण्याची बुद्धिमत्ता आजच्या सत्ताधीशाजवळ जवळ नक्कीच नव्हती आणि मग असेल तर शेतकऱ्यावर अशी कां वेळ आनली? एवढा कुबुद्धीचा साठा राजनीतीत तयार झाला. शेतकरी शेतमजुरांनी डोहात( खड्ड्यात) जाऊन पडू नये याची दक्षता पुरेपूर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या मूळ संविधानात घेतली होती. मात्र त्याच्या दुःखाचे भांडवल करून फक्त राजनीतीचा व्यापार झाला. यासाठी निवडून पाठवणारी जनताच कारणीभूत आहे. शेतकऱ्यांची दूरदशा झालेला इतिहास राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून मांडला. गुरुदेव सेवा मंडळाचे सैन्य उभे केलं.आणि शरद जोशी साहेबांनी त्या प्रश्नाचे उकल करून आंदोलन करून वेळोवेळी कार्यशाळा घेऊन, गावोगावी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते तयार केले. गावोगावी कविता, लिखाण वारकऱ्यांची भजने, तुकारामाचा अभंग गायल्या गेली. पण त्याचा पाझर मात्र राजनीतीला कुठेही सुटला नाही, अन् त्या दुःखावर फुंकर घालण्याचा फक्त सत्तेसाठी झाली आणि राजसत्ता हीच स्वसत्ता तयार झाली. आणि या स्वसत्तेने जिथे तळ्यात पाणी नाही त्या तळ्यात मासे सोडायला सुरुवात केली. काही मासे निसर्गाच्या पाण्यावर लहरीपणात जगली तर काही मासे तडफडत मेली. एवढी घनघोर व्यवस्था राजसत्तेनी केली. शेती पिकवणाऱ्याची शेती जागेवरच राहिली मात्र शेतीची मशागत करणारा तळपळत मेला. आणि राजसत्ता मात्र त्या मरणाऱ्याच्या घरी, आत्महत्येचा चेक घेऊन गेली आणि विधवा महिलांचे हातात शिलाई मशीन दिली. शेतकरी शेतमजुरांना उपाशी मारून विसंगती केली हे मात्र आजही नाकारता येत नाही. शेती पिकवणारा मेला तरी चालेल पण स्वस्त कसे खायला मिळेल अशी जनव्याख्या तयार झाली. सत्तेच्या लालचीसाठी पिकवणाऱ्याची नाहीतर, खाणाऱ्यांची काळजी घेण्यात आली. आणि ही महासत्ता पुरेपूर या गोष्टीचा गेल्या ७५ वर्षे फायदा घेत राहीली. आता हा संघर्ष, आंदोलनातून, प्रचारातून, मेळावा घेऊन संपणार नाही, तर त्यासाठी संघर्ष करायसाठी मनाचा विचार बदलावा लागेल व मतदान बदलावे लागेल. तरच ही राजसत्ता तुमच्या पायाशी लोळण घेत येईल. रस्त्यावरील आंदोलने कमजोर करण्याची शस्त्रे सत्तेजवळ आहेच. परंतु राजकीय शक्तीला कमजोर करण्याचे शस्त्र मात्र लोकशाहीने मतदानातून तुमच्याजवळ दिले आहे.आजही तुम्हाला शेतकरी प्रश्नावर कळवळा असणारी असंख्य साहित्यकार दिसतील, परंतु सर्वात मोठा प्रश्न असा आहे.

शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न सोडविताना मात्र आपण त्याच त्या पक्षाला निवडून देत आलो. त्याचुकीच्या गटांगळात फसत आलो, हे मात्र कबूल करायला कोणीही तयार नाही. इथे मात्र शेतकऱ्यांची परिस्थिती फसली. म्हणजे आपण चुकीच्या पद्धतीने वागून जनतेला सुद्धा फसवत आहोत हे मात्र, साहित्तिक, वारकरी कीर्तनकार , प्रवचनकार, हे मात्र समजून घ्यायला तयार नाहीत. ज्या राज्यकर्त्याच्या व्यवस्थेने आपला घात केला. त्यांचीच आवड म्हणून जनता झेंडे उचलत राहीली. शेतकरी समाजाला दुरुस्त करणाऱ्या समाजसेवकांना आजही मात्र कळले नाही, डूबवलेल्या राजकीय पक्षाच्या सोबत आपण जात आहे. इथेच खरी शेतकऱ्यांची फसगत झाली. ज्याचेसाठी आपण काम करतो, तो शेतकऱ्यांला कुठे घेऊन जात आहे, याचे भान अजूनही राजकीय पक्षाच्या नेत्यांना नाही. ते फक्त त्यांचा उल्लू शिधा करून घेण्यासाठी शेतकरी- शेतमजूर समाजाचा उपयोग करून घेत आहे. पंचायत समिती, जिल्हा परिषद, तहसीलच्या कामात शेतकरी- शेतमजुरांना योजना सांगून फक्त गुंतवून ठेवायचे आणि आपल्याच ठराविक माणसाची कामे करायची यामुळे नेते तयार झालेत, मात्र समाज जाग्यावरच राहिला. शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वतंत्र्यासाठी शेतकऱ्यां मध्ये समृद्धी येण्यासाठी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी गेल्या ४० वर्षांपासून सतत प्रयत्न केलेत. परंतु सर्वच राजकीय पक्षाच्या सत्ताधीशांनी ही चळवळ मोडकळीस आनण्याचे प्रयत्न सत्तेतून झाले, म्हणून याला सत्ता व जनता दोघेही जबाबदार आहे. राजकीय सत्तेने मात्र पूर्णपणे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचारावर चालत असलेल्या चळवळी भरडल्या गेल्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जसे लोकप्रतिनिधी म्हणून सत्तेत पाहिजे नव्हते, तसेच त्यांचे आर्थिक स्वातंत्र्यवादी विचार सुद्धा रूजु होऊ नये, ही खबरदारी घेतल्या गेली हेच चित्र पाहायला दिसले. बऱ्याच शेतकरी नेत्यांनी आपले जीवनातील काही वर्ष शेतकरी संघटनेच्या आंदोलनाला दिलेत. याचा अर्थ त्यांनी मरेपर्यंत आंदोलनातच काम करावे असा होत नसतो. काही शेतकरी नेते सत्तेतही गेले असेल, मात्र राजसत्ता दुसऱ्याच्या ताब्यात( गॉडफादरच्या संपर्कात) असल्यामुळे तेथे जाऊन सुद्धा ते काहीही करू शकले नाही. शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी फक्त शेतकरी संघटनेचे बिल्लाधारी शेतकऱ्यांना शेतमजुराला कायद्याचे आणि धोरणाची माहिती असून ,तेच ही व्यवस्था दुरुस्त करू शकतात , एवढे मात्र निश्चित . शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याची वाटचाल काढणे ही एक अतिशय गंभीर समस्या आजच्या लोकशाहीच्या वाटचालीत फसलेली आहे, ही बाब दुर्लभ आहे, तरी मात्र दुर्लभ परिस्थितीवर मात करणे हेच खऱ्या अर्थाने सामर्थ्य आहे. सर्वच राजकीय पक्षाची धोरणे हे शेतीत उत्पादन वाढवून समाजाला जगविण्याची अपेक्षा बाळगतात. परंतु ही धोरणे शेतीत उत्पादन वाढविणाऱ्या शेतकऱ्यांच्या बाजूचे जर होत नसेल तर पुन्हा ही नाव पाण्यात डुबल्याशिवाय राहणार नाही. पुढील व्यवस्था आहे शेतीला चालवणारी असली तरी ती शेतकऱ्यांना मात्र दुरुस्त करणारी असावी. तरच शेतीचे महत्व वाढेल व बेरोजगार युवकांचे लक्ष शेतीत लागेल. आज कोणतेही बेरोजगार युवकांना शेतीत नफा, बचत, मिळकत दिसत नसल्यामुळे, त्याचा अपेक्षाभंग झालेला दिसत आहे. आई वडील पर परांगत शेती करून सुद्धा त्यांच्या जीवनात काही फरक पडला नाही हे चित्र मुलाला डोळ्यासमोर दिसत आहे. शेती करून काहीही पैसा हाती शिल्लक राहत नाही हे त्यांच्या कुटुंबातील व्यवस्थापनामुळे लक्षात आल्यामुळे त्यांनी शहराची वाटचाल धरणे सुरू केली. ज्या शेतीच्या भरोशावर कुटुंबाचे पालन पोषण होत नाही त्या व्यवस्थेत गुंतून ते बेरोजगार युवक काय करणार? म्हणून शेतकऱ्याला जगवणारी व्यवस्था व कायदे दुरुस्त करण्यात यावे त्यासाठी शेतकऱ्यांच्या पाठीमागे राजकीय पक्षाची भूमिका पाठीशी असावी व पण शेतकऱ्याला राजाश्रय मिळाला तरच शेतकरी हिताचे कायदे तयार होऊन, शेतकरी सुखी झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच म्हणावे लागेल शेतीला जरी उत्पादन वाढीसाठी आश्रय असेल तरी मात्र शेती पिकवणारा शेतकरी मात्र वंचित ठेवला, त्याला न्याय अधिकार व समस्या मात्र सुटलेल्या नाहीत. म्हणूनच भारत या कृषिप्रधान देशात स्वतंत्र शेतकरी मंत्रालय असणे गरजेचे आहे. आणि त्यामध्ये शेतकरी दुरुस्त होणारी कायदे व तशी परिपूर्ण व्यवस्था असावी. राज्यकर्त्यांना जर शेतकरी शेतमजुरांची कदर नसेल तर जनता सुद्धा राजाची कदर करणार नाही. राजाच्या अंगावर जनता धाऊन पडेल. शेतकरी हिताचे धोरणे राबवणारी होत नसेल तर त्याचे परिणाम नक्कीच सत्ताधीशांना भोगावे लागेल यात काही शंका नाही. आज जरी शहरी वातावरणावर राजकारणाची परिस्थिती जरी अवलंबून असेल असे वाटत असेल, तर मात्र ग्रामीण जनता पेटून उठल्यावर त्याचे दुष्परिणाम पाहायला मिळेल आणि नंतर मात्र अशी परिस्थिती आटोक्यात येणे कठीण जाईल.

**- धनंजय पाटील काकड; अध्यक्ष : शेतकरी-वारकरी, कष्टकरी महासंघ, अमरावती**

# अशोक भाऊंचा अयोध्या कार्यक्रमाचे साक्षीदार असल्याचा अनुभव संवाद!



महाराष्ट्रातील ही आमची बत्तीसावी पिढी. आमचा ८८० वर्षांचा इतिहास उपलब्ध असून महाराष्ट्रात येवून १२८ वर्ष झाली. आमच्या घर-घराण्याला धार्मिक आणि आध्यात्मिक कार्याची परंपरा आहे. आमचे जे पूर्वज आमच्या सोबत नाहीत त्या सर्वांचा तसेच आमच्या आई-वडिलांचा दिव्य आशिष आम्हाला लाभला असून थोरामोठ्यांचे आशीर्वाद ही पाठीशी आहेत. जळगाव जिल्हा वासियांचा-आपणासर्वांचा सदिच्छेमुळे मला अयोध्या येथील प्राण प्रतिष्ठा सोहळ्याला उपस्थित राहण्याची संधी मिळाली. १४० कोटींच्या वर लोकसंख्या असेलेल्या या महान भारत वर्षातून तसेच जळगाव जिल्ह्यातील ५० लाख नागरिकांच्या वतीने अयोध्या येथील रामलल्ला प्राण प्रतिष्ठा सोहळ्याला उपस्थित राहण्याचे भाग्य मला लाभले.

आयुष्याच्या या वाटचालीत अयोध्या येथे प्रभू श्री रामलल्लाचे आगमन, प्राण प्रतिष्ठा तसेच मंदिर निर्माणानिमित्त अयोध्या येथे जाण्याचं मला सौभाग्य प्राप्त झालं, ही माझ्या आयुष्यातील सर्वांग सुंदर अनुभूती आहे! माझ्या वडिलांच्या शब्दात सांगायचे तर Leave this word better than you found it - सार्थक करूया जन्माचे, रुप पालटू वसुंधरेचे!- आयुष्याच्या प्रत्येक पावलावर प्रत्येक क्षेत्रात माझ्या वडिलांचे हे ब्रीद वाक्य सत्यात उतरवण्याचा प्रयत्न आम्ही करीत असतो. या घटनेमुळे तर मी निश्चितच सविनय मात्र अभिमानाने सांगू इच्छितो की, माझ्या वडिलांच्या या ब्रीद वाक्याचा अर्थ पूर्णपणे सार्थक झाला आहे.

निमंत्रण देण्यासाठी विश्व हिंदू परिषदेचे प्रांत मंत्री योगेश्वर गर्गे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत सहकार्यवह स्वानंद झारे, विश्व हिंदू परिषदेचे प्रांत सहमंत्री ललित चौधरी आणि जिल्हा कार्यवाह हितेश पवार यांनी दि. १६ जानेवारी २०२४ रोजी श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र अयोध्या यांच्यावतीने मला आमंत्रण दिले. दि. २२ तारखेला लाभलेली अनुभूती म्हणजे सनातन धर्मात जगातील सर्वात मोठा सनातन धर्माचा उत्सव संपन्न झाला असेच म्हणता येईल.

व्हॅटीकनसिटी येथे ख्रिश्चन धर्मीय एक करोडच्यावर दरवर्षी भेट देत असतात. मक्का मदीना येथे दोन ते तीन कोटीच्या दरम्यान मुस्लीम भेट देत असतात. गोल्डन टेम्पल येथे तीने ते साडेतीन करोड, तिरुपती येथे तीन ते चार करोड भेट देतात. अयोध्या येथे मात्र दरवर्षी पाच करोड भाविक भेट देतील हे नक्की! जगातील सर्वात मोठं धार्मिक आणि अध्यात्मिक स्थळ अयोध्या हेच असणार आहे.

**भाग्यवंत म्हणो तया**
**नेत्री पाहिले रामराया ।**
**प्राणप्रतिष्ठा सोहळा**
**याची डोळा पाहिला ।**
**पूर्वसूकृत कामी आले**
**अयोध्येसी जाणे झाले ।**

कान्हदेश आणि अयोध्याचा संदर्भ

२२ तारखेला जगातील सर्वात मोठा उत्सव साजरा झाला. अयोध्या नगरीत रामलल्लाच्या प्रतिमेची प्राण प्रतिष्ठा झाली. सर्व जग त्या क्षणाची आतुरतेनी वाट पहात होते.

१. अयोध्या नगरीच्या आंतरराष्ट्रीय विमान तळाला वाल्मिक ऋषीचे नावं देण्यात आले आहे.
२. हनुमानाची मूर्ती तर प्रत्येक ठिकाणी रामा सोबत आहे.
३. जटायूचीही मूर्ती राम मंदिरात बसविण्यात आली आहे.
४. मंदिरातील भोजन कक्षाला शबरीच नावं देण्यात आले आहे.
५. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यां तळोद्याच्या मल्हारराव होळकर यांच्या सून. ब्रिटिश सत्ता स्थापन होण्या आधी खान्देश होळकर राज्याचा भाग होता. त्या खान्देश राणीची अहिल्यादेवींचीही मूर्तीही राम मंदिरात बसविण्यात येणार आहे.
६. थाळनेरच्या लता मंगेशकर यांचं नावं एका मुख्य चौकाला देण्यात आले आहे.
७. सरदार पटेल यांचा स्टॅच्यू ऑफ युनिटी हा जगातील सर्वात उंच पुतळा आहे. याच्या पेक्षा उंच रामाचा पुतळा आयोध्येत बसाविण्याची योजना आहे. हां पुतळा गोंदूर धुळे येथील राम सुतार तयार करणार आहेत.
८. सोनगीर हे तांबे पितळीच्या भांडयासाठी प्रसिद्धी आहे. या तांबट कासाराणी २०० ताब्याचे नक्षीदार कळस तयार करून आयोध्येलां पाठविले आहेत. या कळसानें रामलल्ला वर प्राण प्रतिष्ठाच्या वेळी जलाभीषक होणार आहे.

मला वाटत आयोध्येत एवढा मोठा सन्मान जो कान्हदेशचा झाला हा मान ईतर कोणालाही मिळाला नसेल.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड. रूपेश शिंदे. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

क्राईम संध्या | सोमवार दि. २९ जानेवारी २०२४ ते रविवार दि. ४ फेब्रुवारी २०२४ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ५

# प्रभू श्री राम कोट्यावधी जनतेचे आहेत मात्र भाजपाने राजकारणासाठी त्यांचा वापर केला!

## काँग्रेसचे प्रभारी रमेश चैन्नीथाल यांची टीका

**भिवंडी/प्रतिनिधी**

प्रभू श्री राम हे सर्वांचेच आहेत, मात्र भाजप त्याचा राजकारणासाठी वापर करतो. देशात महागाई बेरोजगारी सारख्या अनेक समस्या असून युवकांसोबत सर्वसामान्य जनता त्रस्त असताना भाजपा फक्त मतांचे राजकारण करण्यात व्यस्त आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रात तीन वेळा येऊन गेले, परंतु त्यांनी महाराष्ट्रासाठी भरीव असे काहीही केले नाही. श्रीराम सर्वांचे आहेत असून त्यांची पूजा आराधना देशातील कोट्यवधी जनता करीत आली आहे. आयोध्या येथील राम मंदिरात प्रभू श्री रामांपेक्षा जास्त महत्व मोदींना दिले गेले हे सर्व राजकारणासाठी चालले आहे अशी टीका काँग्रेसचे प्रभारी रमेश चैन्नीथाल यांनी भिवंडीत केली. बुधवारी लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने मोर्चे बांधणी करण्यासाठी कोकण विभागीय काँग्रेस जिल्हा न्याय आढावा बैठकीचे आयोजन भिवंडी येथील वाटिका हॉटेल या ठिकाणी करण्यात आले होते.याप्रसंगी आयोजित पत्रकार परिषदेत चैन्नीथाल बोलत होते. या प्रसंगी मार्गदर्शन करण्यासाठी काँग्रेसचे




प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विरोधीपक्ष नेते विजय वड्डेटीवार, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आरिफ नसीम खान, चंद्रकांत हांडोर, भालचंद्र मुणगेकर, हुसेन दलवाई आयोजक ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष दयानंद चोरघे यांसह मोठ्या संख्येने काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्रात महाविकास आघाडी सर्व ताकदीने लोकसभा निवडणूक लढवणार असून महाराष्ट्रातील जागावाटप जानेवारी अखेरीस पूर्ण होणार आहे अशी माहिती देत सर्वच पक्षांना जागा मागण्याचा अधिकार आहे, परंतु त्याबाबतचा अंतिम निर्णय इंडिया आघाडीच्या वरिष्ठ पक्ष नेत्यांकडून घेतला जाणार आहे, असेही यावेळी सांगण्यात आले. आसामचे मुख्यमंत्री चोर असून ते सर्वाधिक भ्रष्टाचारी सरकार चालवत आहेत. राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेला प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याने आसाम सरकारने त्यामध्ये अडथळा निर्माण करण्यासाठी राहुल गांधी यांच्या वर एफ आय आर दाखल केली आहे. केंद्र सरकार विरोधकांवर दबाव टाकण्यासाठी ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्स यांचा वापर करीत असून त्यामुळे रोहित पवार यांच्यावरील कारवाई राजकीय हेतूने असल्याने त्याचा आम्ही निषेध करतो असे मत देखील यावेळी काँग्रेसचे प्रभारी रमेश चैन्नीथाल यांनी व्यक्त केले.राष्ट्रपती केवळ आदिवासी व महिला असल्यानेच त्यांना आयोध्या राम मंदिर सोहळ्याला निमंत्रित केले नाही अशी टीका देखील यावेळी करण्यात आली. भिवंडी लोकसभा काँग्रेस लढवणार का या प्रश्नावर कोणतेही ठाम मत काँग्रेस पक्षाकडून व्यक्त न करता त्या बाबत स्पष्ट बोलण्याचे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी टाळले. तर इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्षांना मेरिट वर लोकसभा जागांचे वितरण होणार आहे अशी माहिती नाना पटोले यांनी दिली. या पत्रकार परिषदे नंतर जिल्हा निहाय पदाधिकारी यांच्याशी काँग्रेस वरिष्ठ नेत्यांनी बंद दाराआड चर्चा करीत सर्व लोकसभा मतदार संघाचा आढावा घेतला. तर कोकण विभागीय आढावा बैठक यशस्वी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा पदाधिकारी कार्यकर्ते यांनी विशेष मेहनत घेतली.

# नेहरोली येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा







**वाडा/प्रतिनिधी**

भारताचा प्रजासत्ताक ७५वा वर्धापन दिन नेहरोली येथे उत्साहात साजरा करण्यात आला. नेहरोली ग्रामपंचायत कार्यालया समोर सरपंच संजना गिंभल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. नेहरोली जिल्हा परिषद शाळा येथे गावचे उपसरपंच प्रथमेश ठाकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तर शारदा विद्यालय येथे कुडुस विभागिय शिक्षण सेवा संस्थेचे संचालक जे.एस. पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले दरम्यान राष्ट्री गीत, ढोल-तशा व लेझीमच्या तालावर शालेय विध्यार्थ्यांची गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून नेहरोली गावच्या नागरीकांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय करून दिली आहे. कुडूस येथील कोका कोला कंपनीच्या सी.आर.एस. निधीतून ही सोय करण्यात आली असल्याची माहिती उपसरपंच प्रथमेश ठाकरे यांनी दिली. तर नागरिकांना या वॉटर फिल्टर प्लांट मधून एक रुपयात एक लिटर आणि पाच रुपयात वीस लिटर पाणी मिळणार आहे तरी या योजनेचा वापर करून नागरिकांनी शुद्ध पाणी वापरण्याचे आवाहन ठाकरे यांनी केले आहे.

# देवणीत मराठा समाजाला आरक्षण मिळाल्याबद्दल आनंदोत्सव साजरा!



**देवणी/प्रतिनिधी**

मनोज जारंगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनामुळे अखेर राज्य सरकार मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गा मधून आरक्षण दिल्याबद्दल शनिवार रोजी सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने बोरोळ चौकात फटाके फोडूण आनंदोत्सव साजरा करण्यात आला यावेळी प्रा.अनिल इंगोले, बालाजी वळसांगविकर, प्रशांत पाटील, दत्ता हुरूचनाळे, सोपान सूर्यवंशी, अंकुश माने, धनराज बिरादार, कृष्णा इंगोले, राहुल बालुरे, सुभाष पाटील, संदीप पाटील यांच्या सह देवणी तालुक्यातील मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# काशीविश्वेश्वर प्रशालेतील कृषी आनंद बाजारात ५० हजारांची उलाढाल

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

अक्कलकोट तालुक्यातील जेऊर येथील श्री काशीविश्वेश्वर माध्यमिक आणि उच्च माध्यमिक प्रशालेत संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन पाटील यांच्या मार्गदर्शनात आज रविवारी सकाळी आठ ते अकरा या वेळेत कृषी आनंद बाजार मोठ्या उत्साहात संपन्न झाला. त्याचे उद्घाटन शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मल्लिकार्जुन पाटील व उपस्थित शेतकरी बांधवांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे आपल्या शेतात पिकलेले फळे, भाजीपाला तसेच घरात बनवलेले अनेक खाद्यपदार्थांचे स्टॉल्स विक्रीसाठी लावण्यात आलेले होते. आज झालेल्या व्यवहारात लावण्यात आलेल्या केवळ तीन तासात शंभर स्टॉल्स मधून सरासरी २०० ते २९०० रुपये एवढा व्यवहार प्रत्येक स्टॉल्स होऊन एकूण पन्नास हजार रुपयांची आर्थिक उलाढाल झाली. आजच्या या कृषी आनंद बाजारात



विद्यार्थ्यांचा आनंद ओसंडून वाहत होता. स्टॉल मध्ये विक्रीसाठी आणलेले विद्यार्थी आणि खरेदीदार यांच्या चांगल्या समन्वयाने आजचा बाजार कमालीचा यशस्वी ठरला. यावेळी उपसरपंच काशिनाथ पाटील, अंबराया कनोजी, इरण्णा कणमुसे, शिवराज बोरिकरजगी, रविकांत स्वामी, मल्लिकार्जुन कापसे, रमेश भरमशेट्टी, बमलिंग वग्गे, धोंडप्पा कापसे, काशिनाथ चपळगाव, संतोष गुरव, लक्ष्मण हुक्केरी, परमेश्वर चपळगांव, सुरेश निंबाळ, काशिनाथ कडगंची, नागनाथ कापसे व शेतकरी बांधव पालक व माजी विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. शालेय विद्यार्थ्यात व्यवहार ज्ञान निर्माण व्हावे, आपले शेतातील पिकविलेले वस्तू विक्री कसे करावे याचे ज्ञान व्हावे तसेच व्यवहारातील नफा तोटा त्यांना समजावा या उद्देशाने प्रशालेने हा कार्यक्रम आयोजित केला होता.चारच दिवसात विद्यार्थ्यांनी आपल्या शेतात पिकलेले शेकडो वस्तू विक्रीसाठी आणले होते, ज्यात नारळ, मध, पपई, उसाचा रस, केळी, मिरची, टोमॅटो, सेंद्रिय चिक्कू, पेरू, ऊस आणि लिंबू यासह अनेक फळ व पालेभाज्या त्याशिवाय खाद्य पदार्थात भेळ, पापड, सामोसे, पॅटिस, पेढा, सँडविच, चहा, बूस्ट, लेमन चहा, शेंगा लाडू, दाल राईस यासह अनेक गोष्टीचा समावेश होता. उपस्थित मान्यवर,पालक, माजी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर बंधू आणि भगिनीं आणि विद्यार्थी या कृषी आनंद बाजाराचा खरेदी करत मनमुराद आनंद लुटला. माजी विद्यार्थी व पालक यांनी प्रशालेने राबविलेल्या या उपक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. प्रशालेने वारंवार असे विद्यार्थ्यांना पूरक उपक्रम राबवावेत असे आवाहन देखील केले. या उपक्रमानंतर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थांनी संपूर्ण मैदानाची स्वच्छता मोहीम राबवून मैदान पुन्हा स्वच्छ व सुंदर ठेवण्याचे काम केले. कार्यक्रमाचे संयोजन श्री काशिविश्वेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षक व शिक्षेकतर बांधवानी केले.

# आबासाहेब इंग्लिश स्कूल अँड ज्यु. कॉलेज देवणी येथे प्रजासत्ताक दिन साजरा

**देवणी/प्रतिनिधी**

जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठान भोपणी द्वारा संचलित आबासाहेब इंग्लिश स्कूल अँड ज्यु. कॉलेज देवणी येथे ७५वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जन सेवाभावी प्रतिष्ठान भोपणी चे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रमूख पाहूणे म्हणून रहीम खुरेशि, देविदास पतंगे, डॉ संतोष बिरादार, अमरदीप बोरे, जावेद येरोळे, प्रवीण बेळे, इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी शाळेच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यांनतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे प्राचार्य राहुल बालूरे यांनी केले व त्याचबरोबर अमरदिप बोरे यांनी शाळेतील शिस्तीचे कौतुक करत आपले मनोगत व्यक्त केले तर डॉ शिवाजी सोनटक्के यांनी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या कार्याचे कौतुक करत आपले मनोगत व्यक्त केले,या कार्यक्रमाचे आयोजन जन सेवाभावी प्रतिष्ठान भोपणी चे संस्था सचिव गजानन भोपणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ज्युनियर कॉलेज चे प्राचार्य डॉ चंद्रकांत जावळे, इंग्लिश शाळेचे प्राचार्य राहुल बालुरे,उपप्राचार्य रामदास नागराळे, व्यवस्थापक सुप्रिया कांबळे यांनी केले.



# भिवंडीत पाच दिवस रंगणार आगरी महोत्सव; विविध कार्यक्रमांचेही आयोजन

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी तालुक्यात स्थानिक भूमिपुत्र समाज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आगरी समाजाच्या आगरी महोत्सवाचे आयोजन दिनांक २५ जानेवारी ते ३० जानेवारी २०२४ दरम्यान सोनाळे येथील ग्रामपंचायत क्रीडांगणावर करण्यात आल्याची माहिती




आयोजन समितीचे प्रमुख संस्थापक विशु भाऊ म्हात्रे यांनी दिली आहे. या प्रसंगी महोत्सव समितीचे अध्यक्ष दयानंद चोरघे, पदाधिकारी यशवंत सोरे, संतोष पाटील, रमेश कराळे, सुनील पाटील, रवींद्र तरे, सौ नंदिनी भोईर, मनोहर तरे आदी पदाधिकारी उपस्थित होते. मागील अकरा वर्षांपासून या आगरी महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असून यंदा या महोत्सवात आगरी समाजा सोबत सर्व समाजाला सोबत घेऊन हा सोहळा साजरा केला जाणार आहे अशी माहिती आयोजन समितीचे यशवंत सोरे यांनी दिली. या महोत्सवात आगरी रूढी परंपरा, पारंपरिक शेतीचे प्रदर्शन, दुर्गाडी किल्ल्याची प्रतिकृती उभारण्यात आली आहे. या महोत्सवाची सुरवात गुरुवारी वारकरी महोत्सव दिंडी भजन कीर्तन कार्यक्रम भगवंताच्या नामस्मरणाने साजरा केला जाणार आहे. या नंतर वसंत हंकारे यांचे युवतींसाठी प्रबोधनपर व्याख्यान आयोजन केले आहे. तर स्थानिक कलावंतांच्या सांस्कृतिक कार्यक्रम, आगरी पद्धतीचे खानपान स्टॉल यांची रेलचेल या ठिकाणी असणार आहे. तर सर्व समाजातील गुणवंतांचा सन्मान या कार्यक्रमा दरम्यान केला जाणार आहे अशी माहिती यशवंत सोरे यांनी दिली आहे. तसेच नागरिकांनीही येथे भेट देण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

# महात्मा बसवेश्वर महामंडळासह संत काशिबा गुरव महामंडळ कार्यान्वित; गरजूंना योजनेचा लाभ घेण्याचे महामंडळाचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळांतर्गत जगदज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ व संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ कार्यान्वित झाले आहे. या महामडळांमार्फत राज्यातील गुरव व लिंगायत समाजातील घटकांसाठी व्यापार, उद्योग, शेतीपूरक व्यवसाय तसेच व्यावसायिक व उच्च शिक्षणासाठी विविध कर्ज योजना उपलब्ध आहेत. या महामंडळाच्या योजनांचा लाभ जास्तीत जास्त गुरव व लिंगायत समाजाच्या लाभार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन महामंडळाचे मुंबई शहर/ उपनगर जिल्हा व्यवस्थापक किशोर म्हस्के यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये केले आहे.

**कर्ज योजनांची माहिती खालीलप्रमाणे**

ऑनलाईन कर्ज योजना- राष्ट्रीयकृत, नागरी, सहकारी, शेड्यूल्ड-मल्टिशेड्यूल्ड बँकांकडून घेतलेल्या कर्जाच्या दरमहा नियमित परतफेड केलेल्या हप्त्यावरील १२ टक्क्ये पर्यंतच्या व्याजाच्या व ५ वर्ष पर्यंतच्या मुदत कर्जावरील व्याज रकमेचा परतावा लाभार्थ्यास ऑनलाइन पद्धतीने बचत खात्यात महामंडळातर्फे जमा करण्यात येईल. लाभार्थ्यांनी बँकेकडे कर्जासाठी अर्ज करण्यापूर्वी महामंडळाचे पात्रता प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे. ऑनलाइन कर्ज योजनांसाठी अर्ज महामंडळाच्या www.msobcfdc.org या वेबसाइटवर अर्ज करावा.

१) वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना- व्यापार उद्योग, सेवा व शेतीपूरक व्यवसायासाठी लागणारे कर्ज, कर्ज मर्यादा १० लाख रुपये पर्यंत, अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपयांपर्यंत.

२) गटकर्ज व्याज परतावा योजना- बचत गट, भागीदारी संस्था (निबंधक मुंबई प्राधिकृत), सहकारी संस्था (जिल्हा उपनिबंधक प्राधिकृत) इ. कर्ज मर्यादा १० ते ५० लाख रुपये, गटातील सभासदांची वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपये पर्यंत.

३) शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना- पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी कर्ज, देशांतर्गत शिक्षणासाठी १० लाख रुपये, विदेशात शिक्षणासाठी २० लाख रुपये. (अभ्यासक्रम आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यावसायिक -व्यवस्थापन, कृषी , अन्न प्रक्रिया व पशु विज्ञान.) अर्जदाराच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपये पर्यंत.

४) महिला स्वयंसिद्धी कर्ज व्याज परतावा योजना- महिला बचतगटांसाठी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या लोकसंचालित साधन केंद्राच्या सहाय्याने राबविण्यात येईल. प्रथम टप्प्यात ५ लाख रुपयांचे कर्ज घेण्यास मान्यता व कर्ज परतफेडीनंतर द्वितीय टप्प्यांत १० लाख रुपये कर्ज घेण्यास पात्र.

**ऑफलाईन कर्ज योजना**

१) थेट कर्ज योजना- १ लाख रुपये कर्ज महामंडळामार्फत, नियमित कर्ज परतफेडीवर व्याज आकारले जाणार नाही. थकित कर्जावर ४ टक्के व्याज आकारले जाईल. कर्ज परतफेड कालावधी ४ वर्षे (२०८५ रुपये मासिक हप्ता), अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा १ लाख रुपयापर्यंत.

२) बीज भांडवल कर्ज योजना- राष्ट्रीयकृत व जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत राबविण्यात येईल. कर्जमर्यादा ५ लाख रुपये, बँक मंजूर कर्ज रकमेत महामंडळ सहभाग २० टक्के व बँकेचा सहभाग ७५ टक्के व लाभार्थ्याचा सहभाग ५ टक्के असेल. व्याजदर महामंडळ सहभागावर ६ टक्के बँकेच्या सहभागावर प्रचलित बँक व्याजदरानुसार, अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा १ लाख रुपये पर्यंत.

पात्रतेचे निकषः- लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी व इतर मागासवर्गीय असावा. महामंडळ, बँक अथवा कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा, कुटुंबातील एकाच व्यक्तीस लाभ घेता येईल. वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे, निवडलेल्या व्यवसायाचे ज्ञान, अनुभव असणे आवश्यक, कर्जाच्या अटी शर्ती महामंडळ ठरवेल त्याप्रमाणे असतील. सर्व व्याज परतावा योजनांसाठी लाभार्थ्याने कर्ज मंजुरीसाठी बँकेकडे जाण्यापूर्वी महामंडळाचे पात्रता प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे. गुरव व लिंगायत समाजाच्या बांधवांनी योजनांची अधिक माहिती, ऑफलाइन कर्ज योजनांच्या अर्जासाठी शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ, गृहनिर्माण भवन, खोली क्रमांक ३३, तळमजला, कलानगर वांद्रे (पूर्व) जिल्हा मुंबई. दूरध्वनी क्रमांक (०२२) २२३५५९७५४१ येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अंबरनाथमध्ये कंपनीला आग, कंपनीचे मोठं नुकसान

**अंबरनाथ/प्रतिनिधी**

अतिरिक्त अंबरनाथ पूर्व (midc) परिसरात एका कंपनीला आग लागून मोठं नुकसान. आनंदनगर अंबरनाथ midcमध्ये कॅनरा इंजिनियरिंग नावाच्या कंपनीला सायंकाळी पाच च्या सुमारास आग लागली. प्रथम कच्या मालाला आग लागली. कच्या मालाला आग लागून कंपनीत आग पसरली.या कंपनी मध्ये कुलिंगसाठी तयार करण्यात येणाऱ्या टाक्यांचे काम, या ठिकाणी केले जात होते. या टाक्या बनवण्यासाठी आणण्यात आलेल्या कच्च्या मालाला ही आग लागली. अंबरनाथच्या अग्निशमन दलाने ही आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न केले. तब्बल दोन तासाच्या अथक प्रयत्नानंतर अग्निशमन दलला आगीवर नियंत्रण मिळवण्यासा यश आले. ही आग आटोक्यात आली. आगीचे नेमके कारण अद्यापही स्पष्ट झालेले नाही. या आगीत कंपनीचे मोठे नुकसान झाले. काही दिवसा अगोदर (माघील आठवड्यात) सुद्धा बदलापूर midc मध्ये कंपनीला आग लागली होती. आगीचे सत्र सुरूच आहे.

29 JANUARY TO 04 FEBRUARY 2024 - Page 6 (CRIME SANDHYA)_Layout 1 27-01-2024 22:17 Page 1



# रिपब्लिकन पक्ष (खोरीपा)तर्फे ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार

मुंबई/प्रतिनिधी





लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पत्रकार बंधू भगिनींच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे ६ जानेवारी पत्रकार दिन.पत्रकार हे समाजात घडणाऱ्या प्रत्येक घटनेची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे अविरत काम करीत असतात. अशा या अविरतपणे काम करणाऱ्या पत्रकारांचा प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला रिपब्लिकन पक्ष (खोरीपा) तर्फेमुंबई आझाद मैदान येथील खोरीप कार्यालयातसन्मान करण्यात आला.रिपब्लिकन पक्षाचे (खोरीपा) प्रदेशाध्यक्ष सुनील भाऊ निरभवणे व एकतावादी रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष दिलीप दादा जगताप या मान्यवरांच्या हस्ते जेष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ, वरिष्ठ क्राईम रिपोर्टर शिरीष वानखेडे, नवशक्ती वरिष्ठ पत्रकार रमेश औताडे आणि दैनिक सकाळ व नवराष्ट्रचे वरिष्ठ पत्रकार दिनेश मराठे यांचा शाल, फुलांचा गुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी खोरीपचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुनील भाऊ निरभवणे, मुंबई अध्यक्ष भागवत कांबळे, कार्याध्यक्ष सलीम खतीब, सरचिटणीस विक्रांत पाटील, वरिष्ठ आंबेडकरी चळवळीचे नेते दिलीप दादा जगताप, रिपाई (आठवले) कामगार नेते प्रकाश जाधव,जेष्ठ आंबेडकरी नेते रोकडे साहेब आणि पत्रकार मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## महामार्गावरील कॉंक्रीटीकरण कामामुळे मेंढवन खिंडीजवळ वाहतूक कोंडी

कासा/प्रतिनिधी



मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाचे कॉंक्रीटीकरण करण्याचे काम सध्या सुरू आहे. त्यामुळे महामार्गावर ठिकठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे. मेंढवन खिंडीजवळही कॉंक्रीटीकरण करण्याचे काम सुरू आहे. कॉंक्रीटीकरण करताना दोन लेन चे काम सुरू असल्याने केवळ एक लेन वाहतुकीसाठी खुली असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे महामार्गावर वाहतूक कोंडी लागत आहे. मेंढवन खिंडीजवळ मुंबई कडून गुजरात दिशेने जाणाऱ्या वाहिनी वरती पाच ते सहा किमी पर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या आहेत. सात वाजल्यापासून ही वाहतूक कोंडी सुरू झाली असून अद्यापही मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी आहे. त्यामुळे वाहन चालकासह प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

पान १ वरून...

## उसन्या पैशाच्या वादातून संपली ...

जबाबदारी मात्र विसरून जातात. त्यातून मैत्री-नात्यात कलह वाढतो. ताटातूट होते. वाढलेला दुरावा आणि धुमसणारा वाद अत्यंत दुर्दैवी घटनेचे कारण बनतो. नाशिक जिल्ह्यातील दोन मित्रांनी एकाला मदत केली, पण तो मदत विसरून गेला. उसने दिलेले पैसे परत करण्यास टाळाटाळ करू लागला. परिणामी मैत्री संपली आणि वाद सुरू झाला. या वादातून मित्रांनीच मित्राचा काटा काढला. तो तर जीवानिशी गेला, तर त्याचे दोन मित्र गजाआड झाले. नांदगाव तालुक्यातील साकोरा-वेहळगाव रस्त्यावर असणाऱ्या मूळ डोंगरी फाट्यावरून एक ॲम्ब्युलन्स निघाली होती. चालक शांतीनाथ राठोड ॲम्ब्युलन्स चालवत होते. आज ॲम्ब्युलन्समध्ये अशी कोणतीही अर्जंट केस नव्हती, त्यामुळे धिम्या गतीने ते जात असतांना त्यांना रस्त्याच्या कडेला कोणीतरी पडल्याचे दिसून आले. नेहमीच रुग्णसेवेस तत्पर असलेल्या ॲम्ब्युलन्स चालक शांतीनाथ राठोड यांच्या मनात त्या व्यक्तीस मदत करायची इच्छा जागृत झाली. ती व्यक्ती जखमी होवून पडली असेल, त्याला लवकरात लवकर दवाखान्यात पोहोचवले तर त्याचे प्राण वाचू शकतील या उद्देशाने ते आपल्या वाहनातून खाली उतरले आणि त्या व्यक्तीजवळ आले. त्याची एकूण स्थिती पहाता तो जिवंत नाही हे त्यांच्या लक्षात आले. एखाद्या वाहनाने या व्यक्तीच्या मोटरसायकलला धडक देवून ते वाहन पुढे गेले असावे. त्यानंतर त्या व्यक्तीस तातडीची मदत न मिळाल्याने त्याचा मृत्यू झाला असावा असेच त्यावेळी शांतीनाथ राठोड यांना वाटले, म्हणून त्यांनी आपल्या गावच्या पोलीस पाटीलांना फोन केला. तसेच मदतीसाठी आपल्या काही मित्रांनाही बोलावून घेतले. रस्त्याच्या कडेला एक व्यक्ती मरून पडली आहे, त्याचा अपघात झाला आहे ही माहिती मिळताच पोलीस पाटील आणि राठोड यांचे मित्र आपापल्या गाड्या घेवून त्याठिकाणी आले. त्यांनी त्या मृत व्यक्तीची पहाणी केली त्यानंतर पोलीस पाटीलांनी नांदगाव पोलीस ठाण्यात मोबाईल फोनवरून या घटनेची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक प्रितम चौधरी व पोलीस पथक घटनास्थळी आले. त्यांनी घटनास्थळाचा आणि मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह नांदगाव ग्रामीण रूग्णालयात पोस्टमार्टमसाठी पाठवला. दरम्यान हे सर्व चालू असतांना मृतकाची ओळख पटवण्याचा प्रयत्न केला तेंव्हा हा मृतदेह साकोरा गावातील (ता. नांदगाव) दिपक रमेश कदम (वय ३०) याचा असल्याचे समजून आले. या घटनेबाबत दिपकची पत्नी आणि त्याच्या नातेवाईकांना खबर देण्यात आली. प्रथमदर्शनी हा अपघात वाटत असला तरी पोलिसांनी मृतदेहाची पहाणी केली तेंव्हा त्यांना काही शंका आल्या होत्या. पण पोस्टमार्टम अहवाल आल्याशिवाय एकदम निष्कर्षापर्यंत येणे योग्य नाही असे म्हणत त्यांनी त्या अहवालाची वाट पहाणे पसंत केले. दरम्यान दिपक याच्या डोक्यावर कोणत्या तरी हत्याराने वार केल्याने त्याचा मृत्यू झाल्याचा अभिप्राय वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पोलिसांना दिला आणि पोलीस सतर्क झाले. दिपक कदम याचा अपघात झाला नव्हता, तसा बनाव करण्यात आला होता हे त्यातून सिद्ध झाले. आता पोलिसांचा तपास सुरू झाला. पोलीस अधीक्षक शहाजी उमाप, अप्पर पोलीस अधीक्षक अनिकेत भारती, उपविभागीय पोलीस अधिकारी सोहेल शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रितम चौधरी यांनी आपले कर्मचारी व खबऱ्यांना कामाला लावले. घटनेआधी दिपक कदम हा कोणाबरोबर होता? त्याचे गावात कुणाशी वैर आहे का? काही अनैतिक संबंध आहेत का? याची माहिती या कर्मचाऱ्यांनी आणि खबऱ्यांनी काढली. त्यामध्ये दिपक एक वर्षापासून गावातीलच एका विवाहित महिलेबरोबर संबंध ठेवून असल्याची माहिती समजली. पोलिसांनी त्या अनुषंगाने तपास केला, पण त्यातून काही निष्पन्न झाले नाही. दुसरी माहिती अशी मिळाली होती की, दिपक कदम याचे साकोरा गावातीलच योगेश बाळासाहेब पगार व देवाजी दगा बोरसे यांच्याशी आर्थिक व्यवहार होत होते. त्यातून त्यांच्यामध्ये भांडणही होत असल्याचे पोलिसांना समजून आले. तसेच घटनेच्या आदल्या रात्री दिपक कदम हा या दोघांसोबत असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरून पोलिसांचा योगेश पगार आणि देवाजी बोरसे या दोघांवर संशय बळावला. पोलिसांनी त्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. योगेश आणि देवाजीकडे पोलिसांनी चौकशी सुरू केली. सुरुवातीला त्यांनी आपण काहीच केले नाही असे दाखवण्याचा प्रयत्न केला, पण पोलिसांनी वेगवेगळ्या तऱ्हेने प्रश्न विचारत खुबीने त्यांच्याकडून गुन्हा वदवून घेतला. योगेश आणि देवाजीला आपला गुन्हा कबुल करावा लागला. त्यांनी दिपक कदमचा खून का ? आणि कसा केला? याची माहिती पोलिसांना दिली. नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यात असणाऱ्या साकोरा गावात दिपक रमेश कदम (वय (३०) हा आपली पत्नी मनिषा हिच्यासोबत रहात होता. योगेश पगार आणि देवाजी बोरसे हे गावातीलच तरूण त्याचे मित्र होते. या तिघांमध्ये आर्थिक देवाण-घेवाण होत असे. सुरूवातीला खेळीमेळीने व एकमेकांना समजून हे आर्थिक व्यवहार होत होते, पण नंतर मात्र त्यांच्यामध्ये या व्यवहारावरून कुरबुरी सुरू झाल्या. दिपक हा आपला आर्थिक व्यवहार वेळेवर पूर्ण करत नसल्याने या कुरबुरी सुरू झाल्या. अशावेळी योगेश आणि देवाजी त्याला समजावून सांगायला गेले की दिपक हा त्यांच्याशी वाद घालत असे. भांडण काढत असे. या साऱ्या प्रकाराला वैतागून योगेश आणि देवाजी हे दिपकला म्हणायचे, 'आपले काय ते आर्थिक व्यवहार आहेत ते मिटवून टाक. 'त्यावेळेपुरते दिपक त्यांना 'हो हो' म्हणायचा, पण त्याची चाल-ढकल मात्र सुरूच होती. त्या कारणामुळे योगेश आणि देवाजी त्याच्यावर भयंकर चिडले होते. दिपक हा पैशाचा व्यवहार मिटवत नसल्याने योगेश आणि देवाजी दोघे जण हैराण झाले होते. पैशांसाठी तो त्रास देत असल्याने तो त्यांच्या मनातून उतरला होता. आता दोघेही जण त्याला पाण्यात पाहू लागले होते. तो आता त्यांना नकोसा झाला होता, मात्र पैशांसाठी वर वर त्याच्याशी गोड-गोड बोलत होते, तर मनातून त्याच्यावर ते दोघे जण खुन्नस खाऊन होते. त्यादिवशी योगेश आणि देवाजी हे दिपककडे आले आणि त्याच्याशी गोड बोलू लागले. 'अरे चल तमाशा बघू' दिपकही लगेच तयार झाला. दिपकला योगेश आणि देवाजी घेवून गेले. रात्रीची वेळ होती. रस्त्यावर चिटपाखरूही नव्हते हे पाहून त्या दोघांनी दिपकच्या डोक्यात लोखंडी रॉडचा जबर प्रहार केला. त्या प्रहाराने दिपक खाली कोसळला. दिपक मरण पावल्यानंतर मात्र त्यांना पोलिसांची भीती वाटू लागली. यातून सुटण्यासाठी त्यांनी अपघाताचा बनाव करण्याचे ठरवले! आणि दिपकचा अपघात झाला हे दाखवण्यासाठी त्याचा मृतदेह वेहळगाव रस्त्यावरील डोंगरी फाट्यावर रस्त्याच्या कडेला टाकला. त्याची मोटरसायकलही पडलेल्या अवस्थेत तेथे टाकून 'दिली, पण त्यांचा हा बनाव टिकला नाही. त्यांनी केलेल्या गुन्ह्याचा उलगडा त्यांनाच करावा लागला. दिपकच्या खुनाबाबत त्याची पत्नी मनिषा हिने फिर्याद दिली. योगेश बाळासाहेब पगार व देवाजी दगा बोरसे या दोघांवर नांदगाव पोलीस ठाण्यात भा.दं.वि. ३०२ व ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सध्या संशयित पोलिसांच्या ताब्यात असून पुढील तपास सुरू आहे.

## पळवून आणलेल्या बाईने विश्वासघात ...

दारू ठोसून घरी येत होता म्हणून सुजाताचे आणि त्याचे कधीच पटत नव्हते. दारूच्या नशेत तो सुजाताला मारहाण करीत होता. त्यामुळे खरे तर त्या दोघांच्या संबंधात कटुता आली होती. तो तिला दारू पिऊन मारहाण करीत असल्याने भांडणात ती त्याला म्हणत होती, मी काय तुझी बायको नाही, तु माझा काय नवरा नवरा नाहीस, तु माझ्यावर नवऱ्यासारखा हक्क गाजवू नकोस. त्यातच सोनहिरा कारखान्या शेजारी एक टायर पंक्चरचे दुकान होते. त्यात दुकानात नामदेव शिंगे हा कामाला होता.तो मुळचा वाळवा तालुक्यातील नरसिंहपुरचा.दररोज तो सोनहिरा कारखाना येथील टायर पंक्चरच्या दुकानात कामाला येत होता. त्याची आणि अक्षय शिंदे याची ओळख होऊन त्या दोघात चांगली मैत्री झाली. नामदेव हा अक्षयच्या घरी सारखा येत जात होता. दोघांना ही दारू पिण्याचे व्यसन असल्याने कधी कधी दारू प्यायला ते अक्षयच्या घरी बसू लागले. त्यातूनच त्याची सुजाताबरोबर चांगली ओळख झाली.अक्षय हा कामावर गेला की नामदेव हा त्याच्या घरी काही तरी कामाचे निमित्य काढून येत होता. त्याला माहित होते की,अक्षयने सुजातला पळवून आणले आहे ती त्याची बायको नाही त्यामुळे तो ही तिच्याशी सलगी वाढण्याचा प्रयत्न करीत असताना ती ही त्याला लाईन देत होती. मुळातच तिचा स्वाभाव हा मनमोकळा असल्याने ती ही नामदेवला आपल्या मनातील बोलून आपले मन हलके करीत होती. अक्षय हा आपल्याला विनाकारण दारूच्या नशेत मारहाण करीत असतो.घर खर्चाला पैसे देत नाही,त्याच्यावर विश्वास ठेवून मी माझ्या नवऱ्याला सोडून आले. आणि तो मात्र मला त्रास देत आहे आता मी काही त्याच्याबरोबर राहणार नाही असे तिने त्याला सांगितल्याने नामदेवच्या ही मनात तिच्या विषयी प्रेम भावना निर्माण झाली.तो ही तिच्याशी लाडीगोडी करीत तिला काय पाहिजे काय नको ते पाहत होता.हल्ली त्या दोघांची सलगी वाढत असल्याचे अक्षयच्या लक्षात आले. तो त्या दोघांच्यावर लक्ष ठेवून होता.दारूच्या नशेत अक्षयने नामदेवला मी नसताना तु माझ्या घराकडे का येतोस? असे विचारले होते.त्यावेळी नामदेवने ही त्याला काही उत्तर दिले नव्हते.त्यामुळे अक्षयच्या मनात त्या दोघांच्या संबंधाची पाल चुकचुकली होती. सुजाताचे आणि त्याचे संबंध असावेत असा संशय त्याच्या डोक्यात शिरला. मी पळवून आणलेली बाई माझ्या शिवाय दुसऱ्याबरोबर संबंध ठेवते याचा त्याला राग आला.त्याने सुजाताला ही समजावून सांगऱ्याचा प्रयत्न केला. परंतु ती काही त्याचे ऐकत नव्हती. तिचे नामदेव बरोबर संबंध असल्याने ती आपले ऐकत नाही हे त्याने ओळखले. त्यातच गेल्या काही दिवसापूर्वी तो ऊस तोडीसाठी गेला होता. परंतु अचानक तो दुपारच्या वेळी घराकडे आला, त्यावेळी घरात त्याला नामदेव आणि सुजाता हे दोघे नको त्या अवस्थेत बेडवर दिसले. त्यावेळी त्याचे डोके सणकले. त्याने त्यावेळी रागाच्या भरात सुजाताला मारहाण केली,आणि नामदेवला ही तो मारायला गेला असता सुजाताने त्याला सोडवून घेऊन अक्षयलाच धमकी दिली की,तु माझा काय नवरा नाहीस माझ्यावर हक्क दाखवतोस. मी काय पण करेन, कोणाबरोबर ही झोपेन, तु माझ्यामध्ये पडू नकोस.तिने असे म्हटल्यावर तो गप्प राहिला. आपण पळवून आणलेल्या मैत्रीणीसोबत नामदेव याने संबंध ठेवल्याचे बघून तो हताश झाला. त्याला सुजाताचा राग आला. त्यामुळे यातून काय मार्ग काढायाचा याचा तो विचार करीत असताना त्याने नामदेव याला संपवायचे असा विचार केला.कारण त्याच्यामुळेच सुजाता आपल्यापासून दुरावत आहे हे त्याने चांगले ओळखले. त्याला कायमचा धडा शिकविला पाहिजे असे त्याने ठरविले. गुरूवार दि.१८ जानेवारी रोजी तो काही काम नसल्याने दिवसभर दारूच्या नशेत होता.रात्री १०च्या दरम्यान नामदेव हा आपले काम आटोपून नरसिंहपुरला जायच्या तयारीत असताना अक्षय हा दारूच्या नशेत तेथे आला. दारूच्या नशेत असताना अक्षयने त्याच्याकडे दारू मागितली. मी आता गावाकडे चाललोय मला गडबड आहे आणि दारूसाठी पैसे ही नाहीत असे म्हटल्यावर अक्षयला त्याचा राग आला. मी पळवून आणलेली बाई तुला त्या कामासाठी पाहिजे म्हणत त्याने नामदेवबरोबर वाद घालायला सुरूवात केली. हा वाद विकोपला गेल्यावर दारूच्या नशेत असणाऱ्या अक्षयने त्याला अर्वाच्च भाषेत शिव्या दयायला सुरूवात केली. त्याचा परिणाम म्हणून नामदेवने त्याला बाजुला ढकलून देत माझ्यावर संशय घेतोस.सुजाता काय तुझी बायको नाही, मी ही तिच्याबरोबर संबंध ठेवणार तुला काय करायचे ते कर. असे म्हटल्यावर अक्षयने आपल्याकडील ऊस तोडीच्या कोयत्याने नामदेवच्या अंगावर,छातीवर डोक्यवर वार केले. रात्रीच्या अंधारात त्यावेळी तेथे फारशी गर्दी ही नव्हती.नामदेवच्या अंगावर छातीवर डोक्यावर कोयत्याने वार केल्यावर तो ओरडत किंचाळत रक्ताच्या थारोळ्यात पडला.त्याचा जागीच मृत्यू झाला.आपल्या हातून नामदेव शिंगे याचा खून झाल्याचे लक्षात येताच तो घटनास्थळावरून पळून गेला. रात्रीच्या अंधारात कोण ओरडले म्हणून बाजुलाच काही अंतरावर असणारे लोकांनी घटनास्थळी धाव घेतली. रक्ताच्या थारोळ्यात नामदेव शिंगे हा पंक्चर काढणारा पडला असल्याचे त्याच्या लक्षात आले. त्यांनी या घटनेची माहिती वांगी चिंचणी पोलीसांना दिली.पोलीसांना ही माहिती मिळताच त्यांनी ही तातडीने घटनास्थळी धाव घेत घटनेची पाहणी केली. घटनास्थळावर रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या इसमाची त्यांनी ओळख पटवून घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी कडेगाव येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला आणि या घटनेची माहिती मयत नरसिंहपुर येथील नामदेव शिंगे याच्या घराच्या लोकांना दिली. घटनास्थळावरील लोकांच्या कडून पोलीसांनी या घटनेची माहिती घेतली असता त्या लोकांनी पोलीसांना सांगितले की, घटनेपूर्वी काही वेळापूर्वी नामदेव याचे ऊस तोडणी मजुर अक्षय शिंदे याच्याबरोबर वादावादी झाल्याचे त्यांनी बघितले. त्या वादावादीत अक्षयने कोयत्यांनी नामदेववर वार केल्याचे त्यांनी सांगितले. घटनास्थळावरून अक्षय शिंदे हा पळून गेला असल्याने पोलीसांनी त्याचा शोध घेतला. तो आपल्या प्रियेसीला घेऊन पळून जात असल्याची माहिती पोलीसांना मिळाल्यावर तो पळून जाण्याच्या अगोदर पोलीसांनी तो राहत असलेल्या ठिकाणावरून त्याला ताब्यात घेतले. त्याला वांगी चिंचणी पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल केला. मी पळवून आणलेल्या बाईबरोबर नामदेव शिंगे याचे संबंध असल्याने रागाच्या भरात मी त्याचा खून केल्याचे त्याने पोलीसांना सांगितले. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर मयत नामदेव शिंगे याच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून नामदेव शिंगे (वय ३०) याच्या खून प्रकरणी अक्षय शिंदे (वय ३२) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल केला. त्याला कडेगाव येथील न्यायालयात हजर केले असता मा.न्यायलयाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला कोयता जप्त केला. या घटनेचा पुढील तपास वांगी चिचंणी पोलीस करीत आहेत. त्या संबंधात वाहवत गेलेली बाई ही कधीच कोणाची नसते.जो दमडी देईल त्यालाच ती चमडी देत असते. त्यातूनच अशा घटना घडतात हेच या घटनेवरून दिसून येते.

पान ८ वरून...

## प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हाधिकारी ...

ग्रामपंचायत व नागरी भागात दिनांक १५ नोव्हेंबर पासून ते दिनांक २६ जानेवारी २०२४ पर्यंत वाटचाल सुरू आहे. या संकल्प यात्रेच्या माध्यमातून आयुष्मान भारत कार्ड, प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना, दीनदयाल अंत्योदय योजना - राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री उज्वला योजना, प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना, तसेच प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, किसान क्रेडिट कार्ड, प्रधानमंत्री पोषण अभियान; हर घर जल (जल जीवन मिशन) जन धन योजना, अटल पेन्शन योजना, नॅनो फर्टिलायझर्स योजना आदी योजनांच्या माध्यमातून जिल्ह्यातील गरजू नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात आलेला आहे.

वनहक्क कायद्यान्वये वैयक्तिक व सामुहिक वनहक्क दावे मंजूर करण्यात आलेले आहेत. जवळपास ३० हजार हेक्टर पेक्षा जास्त जमिनीचा मालकीहक्क आदिवासी बांधवांना देण्यात आलेला असून राज्यामध्ये पालघर जिल्ह्यात सर्वात जास्त वैयक्तिक वनहक्क दावे मंजूर करण्यात आलेले आहेत. जिल्ह्यात प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजने अंतर्गत ९७ हजार ९२६ लाभार्थी पात्र झालेले आहेत. सदर लाभार्थ्यांना केंद्र शासनाच्या 'प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना' तसेच राज्य शासनाच्या 'नमो शेतकरी महासन्मान योजने'चा लाभ मिळणार आहे.कामगार विभागामार्फत विटभट्टी व मनरेगा कामगार तसेच इतर बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात आलेली असून त्यांना विविध कल्याणकारी योजनांचे लाभ देण्यात येतात. पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून जव्हार व डहाणू अंतर्गत असलेल्या आश्रमशाळेमध्ये शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. जव्हार व डहाणू प्रकल्पाअंतर्गत आजतागायत ४५ शासकीय आश्रमशाळांमध्ये उडठ निधीमधून शालेय इमारतीची दुरूस्ती व रंगकाम करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून ५५ शाळांमध्ये १५१ वॉटर हीटर बसविण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे गेल्या आठवड्यात जिल्हामध्ये सुमारे १२५ कोटींच्या विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याव्यतिरिक्त उल्लास नवभारत साक्षर कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्याकरिता पालघर जिल्ह्यातील एकूण ३९ हजार ९१२ एवढे असाक्षर उद्दिष्ट लक्षात घेऊन साक्षरतेचे कामकाज पूर्ण करावयाच्या दृष्टीने स्वयंसेवी पध्दतीने समाजातील साक्षरांनी असाक्षरांना साक्षर करण्याची जबाबदारी स्वयंसेवक म्हणून सर्वांनी स्विकारावी असे आवाहन श्री. बोडके यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार महानाट्यद्वारे राज्यातील जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यामधील प्रत्येक जिल्ह्यामध्ये महानाट्याचे आयोजन करण्यात आलेले असून पालघर येथे दिनांक ८ ते १० मार्च २०२४ यादरम्यान सदर महानाट्याचे सादरीकरण संपन्न होणार आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात पाच दिवसीय महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. पालघर जिल्ह्यामध्ये या महोत्सवाचे दिनांक ७ फेब्रुवारी ते दिनांक ११ फेब्रुवारी २०२४ यादरम्यान सादरीकरण करण्यात येणार आहे. नागरिकांनी या कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन हा कार्यक्रम यशस्वी करावा असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. बोडके यांनी केले.

## मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील ...

डहाणू ११६६, वाडा ३८१, तलासरी ३९१, विक्रमगड १९५, जव्हार २३७, मोखाडा १३२. एकुण तालुका निहाय प्रगणकांची संख्या ३९३२. पालघर जिल्हयातील ८ तालुक्यासाठी नोडल ऑफिसर म्हणजेच तहसिलदार तसेच मास्टर ट्रेनर यांचे प्रशिक्षण दि. २० व २१ जानेवारी रोजी पुर्ण झाले असून तालुकास्तरीय प्रगणक यांचे प्रशिक्षण दि. २२ जानेवारी रोजी पूर्ण झाले असल्याचे जिल्हाधिकारी श्री.बोडके यांनी सांगितले. त्याअनुषंगाने पालघर जिल्हयामध्ये सदर सर्वेक्षणाची अंमलबजावणी योग्यरित्या होण्यसाठी गावोगावी जाऊन दवंडी देऊन लोकांना सदर सर्वेक्षण कालावधी मध्ये घरी राहणेबाबत सुचना तसेच सर्वेक्षण करणाऱ्या प्रगणकाना सहाय्य करण्यचे आवाहान करण्यात आले असून त्याबाबतची सुचना ग्रामपंचायत/तलाठी कार्यालयामध्ये प्रसिध्द करण्याच्या सुचना देण्यात आल्या असल्याचे जिल्हाधिकारी श्री.बोडके यांनी सांगितले..

## गांधी विचार संस्कार परीक्षेद्वारे मोठ्या...

स्मट्स याला अहिंसा मार्गाने गांधीजींनी कसे जिंकले, गांधीजींनी स्वतः तयार करुन दिलेल्या चप्पलेची त्यांनी आयुष्यभर पूजा केली यासंदर्भातील गोष्ट सांगितली. गांधीजींच्या सत्याग्रह व कायदेभंग चळवळीला समाजाने पाठबळ दिल्याचेही ते म्हणाले. साधी सरळ राहणी, कमीत कमी गरजा, कणखरपणा, सामर्थ्याने व निग्रहाने गांधीजींनी माणसे जोडली. त्यासाठी चरखा सारख्या श्रम मूल्य रुजविणाऱ्या साधनाचा त्यांनी वापर केला असेही गायकवाड म्हणाले. गांधी विचार संस्कार परीक्षेस जळगांव जिल्ह्यातील प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग द्यावा असे आवाहन ही त्यांनी या प्रसंगी केले. महात्मा गांधीजींच्या पुतळ्याला मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. आपल्या मनोगतात प्रा. डॉ. अश्विन झाला यांनी मूल्य शिक्षणाद्वारे चारित्र्य निर्मितीचे कार्य गांधी विचार संस्कार परीक्षा करीत असल्याचे सांगितले. मानवतेचा संस्कार देणाऱ्या या परीक्षेच्या आयोजनात समन्वयकांची भूमिका महत्त्वाची आहे. प्रमुख पाहुणे म्हणून मनोगत व्यक्त करतांना सध्याच्या धकाधकीच्या व स्पर्धेच्या युगात प्रगती करतांना शिक्षण व आर्थिक स्तर वाढला मात्र त्याच वेळेस वृद्धाश्रमांची संख्या वाढत आहे हि चिंतेची बाब आहे असे जे. के. पाटील म्हणाले. त्यामुळे गांधीजींनी म्हटल्याप्रमाणे खरी संस्कृती व परंपरा असलेल्या ग्रामीण संस्कृतीचा आपण अंगीकार केला पाहिजे असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विश्वजित पाटील यांनी तर आभार प्रदर्शन गिरीश कुळकर्णी यांनी केले. कार्यक्रमात जळगाव जिल्ह्यातील १२९ शाळा व महाविद्यालयांमधील इ. ५वी ते पदव्युत्तर वर्षांच्या २०६ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदके व प्रमाणपत्र वितरित करण्यात आली. यात ४५ विद्यार्थ्यांना सुवर्ण, ६८ विद्यार्थ्यांना रौप्य तर ९३ विद्यार्थ्यांना कास्य पदकांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे सूत्र संचालन चंद्रशेखर पाटील यांनी केले. कार्यक्रमास गुणवंत विद्यार्थ्यांसह शिक्षक व पालक मोठया संख्येने उपस्थित होते.

## देवणी तहसील कार्यालयातील विशेष...

११९६ अर्ज प्राप्त झाले होते त्यापैकी ११५१ अर्ज मंजुर करण्यात आले व ४५ अर्ज त्रुटींमुळे नोटीस बजावण्यात येणार असल्याचे सांगणयात आले आहे, आवश्यकत्या कागद पत्राची पूर्तता करणाऱ्या श्रावण बाळ योजने अंतर्गत ७७५, व इंदिरा गांधी वर्धपाकाळ योजने अंतर्गत १७२ आणि संजय गांधी निराधार योजने अंतर्गत २०४ प्रकरनाना मंजूरी देण्यात आली, अश्या एकून ११५१ प्रकरनाना मंजूरी देण्यात आली. तरी ४५ प्रकरणे नियम व अटी मध्ये न बसल्याने त्रुटी मध्ये ठेवण्यात आले आहे. यावेळी संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष प्रशांत पाटील जवळगेकर, सचिव तथा तहसीलदार गजानन शिंदे शासकिय सदस्य गटविकास अधिकारी किरण कोळपे, अशासकिय सदस्य मनोहर पटणे, धोंड राज गुणाले, प्रशांत पाटील दवणहिप्परगेकर, तुकाराम पाटील, शिवराज बिरादार, विजयकुमार बोरोळे, उध्दव गायकवाड, सदस्या रंजना पोलकर, सुप्रीया माने तसेच प्रभारी नायब तहसीलदार माधव सांळुके अव्वल कारकुन रितेश कवरे, कोतवाल व्यंकटेश बिजापुरे आयटी अंशिस्टंट प्रदीप कांबळे व शिपाई म्हेत्रे काशिनाथ व सुभाष हांणमंते आदी उपस्थित होते.

# कातकरी जमातीच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व यंत्रणांनी संवेदनशीलपणे काम करावे - आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर

**नवी मुंबई/प्रतिनिधी**

कातकरी जमातीच्या लोकांना विकासाच्या प्रवाहात आण्यासाठी तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी समन्वयाने संवेदनशील काम करावे अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी दिल्या. कातकरी या आदिम जमातीच्या सर्वांगीण विकासासाठी, त्यांचे स्थलांतर रोखणे, त्यांना आधार कार्ड, रेशन कार्ड, जॉब कार्ड, बँकखाते मिळवून देणे, वेठबिगारीचा शोध घेणे या विषयांशी संबंधीत येणाऱ्या अडचणी आणि उपाययोजना याचा सविस्तर आढावा घेण्यासाठी कोंकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली आज श्रमजीवी संघटनेचे प्रमुख, माजी विधानसभा सदस्य व राज्यस्तरीय आदिवासी विकास आढावा समितीचे अध्यक्ष विवेक पंडित यांच्या उपस्थितीत आयुक्त कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.




या बैठकीस उपायुक्त (महसूल) विवेक गायकवाड, मुंबई शहरच्या कामगार उपायुक्त निलांबरी भोसले, कोंकण विभागाचे उपायुक्त (विकास) गिरीष भालेराव, उपायुक्त (पुरवठा) लिलाधर दुफारे, समाज कल्याण उपायुक्त वंदना कोचुरे, पालघरचे सहायक कामगार उपायुक्त प्रशांत महाले आदि अधिकारी उपस्थित होते तसेच जिल्हाधिकारी ठाणे अशोक शिनगारे, जिल्हाधिकारी रायगड डॉ. योगेश म्हसे, जिल्हाधिकारी पालघर गोविंद बोडके, ठाणे ,रायगड, पालघर या जिल्हयांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक व इतर अधिकारी हे दुरदृष्य प्रणालीद्वारे बैठकीस उपस्थित होते. मुंबई अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण संस्थाद्वारे मुंबई विद्यापीठाने आदिवासी आदिम जमाती सर्वेक्षण प्रशिक्षणांतर्गत राज्यातील आदिम कातकरी समाजाची नमुना पहाणी केली आहे. तसा अहवाल श्रमजीवी संघटने समोर सादर करण्यात आला आहे. पहाणी दरम्यान निदर्शनास आलेल्या कातकरी आदिम जमातीच्या विकासासाठी अडथळानिर्माण करणाऱ्या बाबींवर तपशीलवार चर्चा करण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. राज्यात कातकरी समाजाची एकूण २ लाख ९५ हजार ९२ इतकी लोकसंख्या आहे. त्यापैकी ठाणे जिल्ह्यात ५४ हजार ८४९, रायगड जिल्ह्यात १ लाख ३७ हजार ६६३ आणि पालघर जिल्ह्यात १३ हजार ९७२ लोकसंख्या आहे. ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यातील कातकरी आदिम जमातीतील लोकांना घरकूल लाभ मिळवून देणे, घरकूलाच्या यादी देऊनही घरकूल मंजूर न होणे, आधारकार्ड, मतदान कार्ड, पॅनकार्ड, जॉबकार्ड, बँक खाते पुरावे नसल्यामुळे ही कार्ड मिळविण्यास अडचणी निर्माण होणे, घराखालील जागा, गुरचरण जमीन, सरकारी जमीन, वन जमीन, यांचे सर्वेक्षण झाले नाही. बेघर असलेल्या कुटूंबांना घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध नाही. आदिम जमातीकडे सक्षम पुरावे नसल्यामुळे त्यांना जातीचा दाखला काढण्यास अडचण निर्माण होत आहे.

अशा विविध प्रश्नांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी कोकण विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी आदिम जमातीसंदर्भात येणाऱ्या तक्रारींवर तत्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले. आधार नोंदणी, रेशनकार्ड, व बँक खाते तत्काळ उघडण्यासाठी संबधित यंत्रणेला कॅम्प लावण्याचे आदेश दिले. वीटभट्टी सारख्या विविध ठिकाणी काम करणाऱ्या कातकरी समाजातील बाधवांना मजूरी वेळेवर मिळावी याबाबत कार्यवाहीचे आदेश दिले आहेत.

# श्री राम मंदिर प्रतिष्ठापना सोहळा केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटीलांनी अनुभवला भिवंडीतून!




**भिवंडी/प्रतिनिधी**

अयोध्या येथील श्री राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्या निमित्त देशभर उत्साहाचे वातावरण असून,ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले गेले होते. केंद्रीय पंचायतीराज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी भिवंडी शहरातील पद्मानगर येथील श्री राम मंदिर प्रांगणात श्री राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा पाहण्यासाठी हजेरी लावली. कपिल पाटील फाऊंडेशन चे सुमित पाटील यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात आमदार महेश चौघुले, भाजपा शहराध्यक्ष अँड हर्षल पाटील, माजी अध्यक्ष संतोष शेट्टी यांसह शेकडोंच्या संख्येने नागरिकांच्या उपस्थितीत हा सोहळा अनुभवला. त्यानंतर आरती सोहळ्यात सर्वांनी सहभाग घेतला. आपल्या पूर्वजांनी मुघल काळात अन्याय सहन होताना मंदिर उद्ध्वस्त होताना पाहिली आपण भाग्यवान आहोत की प्रभू श्री रामाचे मंदिर उभे राहता असताना त्याचे साक्षीदार होण्याचे भाग्य आपल्या पिढीला लाभले.

५०० वर्षांची आपली प्रतीक्षा संपली आहे. भारताचा जेव्हा केव्हा नवा धार्मिक इतिहास लिहिला जाईल.त्यामुळे प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद आहे. उत्साह आहे अशी प्रतिक्रिया केंद्रीय पंचायतीराज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी दिली आहे. या निमित्त आयोजित महाप्रसादाचा लाभ हजारो भाविकांनी घेतला.

# बांधकाम कामगारांना सुरक्षा साहित्याचे वाटप



**वाडा/प्रतिनिधी**

बांधकाम मजूर व कामगारांना महाराष्ट्र कामगार विभागाच्या वतीने आवश्यक असणाऱ्या सुरक्षा साहित्याचे वाटप मंगळवारी (दि.२३ जानेवारी) करण्यात आले. अतिरिक्त कामगार आयुक्त कोकण विभागाच्या शिरीन लोखंडे मार्गदर्शनाने व उपआयुक्त पालघर किशोर दहिफळकर यांच्या वतीने व गवंडी बांधकाम मजुर व जनरल संघटनेच्या सहकार्यने गांध्रे येथे बांधकाम कामगारांना २०७ सुरक्षा साहित्याचे वाटप करण्यात आले. या वेळी गवंडी बांधकाम मजुर व जनरल संघटनेचे अध्यक्ष भिमराव बागुल, खजिनदार गणपत कामडी, कोर कमिटी सदस्य गजाभाऊ भोईर, सुनिल कुमावत, जिल्हासंघटक राजेंद्र पाटील, सात मित्रांची साथ सामाजिक व शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष सचिन गोळे, सल्लागार निलेश कामडी, जिल्हाउपाध्यक्ष विश्वास चौधरी, तालुका महिला आध्यक्ष मेघना बागुल, उपाध्यक्ष साक्षी माईन राजस्थानी असोसिएशनचे मोहनलाल सैनी, तालुका निरीक्षक शंकर गायकर, शहर प्रमुख संजय पडवळ, उपशहर प्रमुख उमाकांत पाटील, पेंटर कामगार संघटनेचे शशीकांत गडगे, नदीम शेख, कमलाकर कोरडे, सुरेश तांबडे, राहुल बागुल, परळी विभागाचे गणेश पाटील, वसंत दिवा व इतर सदस्य हजर होते.

## डहाणूत आज युवक-युवतीकरिता रोजगार मेळावा

पालघर : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू, ता. डहाणू, जि. पालघर या कार्यालया अंतर्गत सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात दिनांक २९ जानेवारी सकाळी १० वाजता के.एल. पोंदा हायस्कूल, डहाणू येथे युवक-युवतींकरिता रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. सदर मेळाव्यात बोईसर, पालघर, व वसई येथील MIDC मध्ये कार्यरत १०वी, १२वी पास, नापास, डिप्लोमा, आय. टी. आय. बी.एड, डी.एड, कृषी, कौशल्यविकास, बँकिंग क्षेत्रात कार्यरत अश्या एकूण १५ कंपनी सहभागी होणार असून, त्यांच्याकडे एकूण ३१४२ जागा रिक्त असल्याचे कळविले आहे. या रोजगार मेळाव्यांमुळे जवळपास ३१४२ युवक-युवतींना विविध क्षेत्रात रोजगार उपलब्ध होणार असून सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा.

# महिला व बालविकास विभागाच्या चित्ररथास मिळाली कौतुकाची थाप!

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे हस्ते पोलीस मुख्यालय सोलापूर येथे ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला. सदर सोहळ्यास पालकमंत्री चंद्रकांत पाटील, सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले व इतर विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. यावेळी आरोग्य विभाग, परिवहन विभाग, अग्निशमन विभाग, महिला व बालविकास विभाग अशा विविध विभागानी त्यांच्याकडील योजनांची प्रसिद्धी व जन जागृती चित्ररथाद्वारे केली. तथापि या सर्व चित्ररथामध्ये जिल्हा परिषद महिला व बालविकासाच्या चित्ररथाने उपस्थित अधिकाऱ्यांची कौतुकाची थाप मिळवली. महिला व बालविकास विभागाने जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांचे मार्गदर्शनाखाली लेक लाडकी, बेटी बचाओ बेटी पढाओ तसेच सही पोषण देश रोशन या संकल्पनेवर आधारित चित्ररथ तयार केला



होता. यामध्ये कु. ध्रुवी मेहेरकर, कु.कालिका सगरे, कु.संस्कृती सगरे, कु.मीरा मेहेरकर, वरद देशमुख आणि ओजस आल्लडवाड या चिमुकल्यानी पोषण आहाराची वेशभूषा करून सही पोषण देश रोशन असा नारा देत उपस्थितांची मने जिंकली. लहान बालकांना सध्याच्या काळात जंक फूडचे व्यसन लागले असून पालक देखील बालकांचा जंकफूड खाण्याचा हट्ट पुरवतात त्यामुळे कुपोषणाचे प्रमाण वाढत असून सकस आहार कसा असावा? आहारात फळे, पालेभाज्या, दुग्धजन्य पदार्थ, तृणधान्ये यांचा समावेश करावा हा या चित्र रथाचा उद्देश असलेचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांनी सांगितले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी देखील पालकांना त्यांच्या मुलांना मोबाईल व जंकफूड पासून दूर ठेवावे व एक सुपोषित भारत निर्माण करण्यावर भर द्यावा असे आवाहन केले. चित्ररथाचे नियोजन बालविकास प्रकल्प अधिकारी बालाजी अलडवाड, शिवानंद मागे, वरिष्ठ सहायक सचिन आंबेकर, साहेबराव देशमुख, रेणुका प्रथमशेट्टी आणि विस्तार अधिकारी श्रीकांत मेहेरकर यांनी केले.

# आहेरवाडी येथील बेपत्ता झालेल्या तरुणीचा मृतदेह विहिरीत आढळला

**सोलापूर/प्रतिनिधी**




दक्षिण सोलापूर तालुक्यातील आहेरवाडी येथे मागील दोन दिवसांपासून घरातून बेपत्ता झालेल्या उमाश्री भीमाशंकर धोत्रे (वय २१) या अविवाहित तरुणीचा मृतदेह विहिरीतील पाण्यावर तरंगताना गुरुवार १८ जानेवारी रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास मिळून आला. आपला मोबाइल व चप्पल घरामध्ये ठेवून ती १६ जानेवारी रोजी घरातून कोणालाही काही न सांगता निघून गेली होती. याबाबत वळसंग पोलीस ठाण्यात बेपत्ता तक्रारही दाखल करण्यात आली होती. तिचा नातेवाईकांसह अन्यत्र शोध सुरू असताना गुरुवारी सायंकाळी तिचा मृतदेह गावातील पाणीपुरवठा करणार्या विहिरीत तरंगताना आढळून आला. मुलीचे वडिल भीमाशंकर धोत्रे यांनी विहिरीतील पाण्यातून मुलीला बाहेर काढले. या घटनेची खबर वळसंग पोलिसांना मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार आर.डी.निंबाळे यांनी सोलापुरातील सिव्हिल रुग्णालयात शवविच्छेदनासाठी रात्री दाखल केला. या घटनेची नोंद सिव्हिल व्हॉस्पिटल पोलीस चौकीत झाल्याची माहीती शनिवारी देण्यात आली आहे.

# ओरीसा राज्यातून विक्री करण्यासाठी गांजा घेऊन येणाऱ्या टोळीस पाठलाग करून पकडले

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

४ जानेवारी रोजी स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीणचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांना गोपनिय बातमीदार यांचे मार्फत मौजे मोडनिंब, ता. माढा गावचे हद्दीतून जाधववाडी गावाकडे जाणारे रस्त्यावरील गोलावर चौक येथे काही इसम दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास च्या नंतर त्यांचेकडील दोन चारचाकी वाहन मारूती सुझुकी ब्रेझा, पांढरे रंगाची कार क्रमांक MH-45/N-6752, २) रेनॉल्ट कंपनीची ट्रीबर, सिल्वर रंगाची कार क्रमांक MH-45/AQ-7821 मधून हे गांजा हे मादक अंमली पदार्थ ओरीसा राज्यातून घेवून येवून तो अकलूज येथे घेवून जाणार असल्याबाबत माहिती मिळाली होती. सदर बातमी ही खात्रीशीर असल्याने त्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी सर्व स्थानिक गुन्हे शाखेकडील सपोनि धनंजय पोरे व पोलीस अंमलदार यांना सतर्क केले. गांजा या अंमली पदार्थावर छापा घालण्यासाठी सर्व कायदेशीर प्रक्रिया पार पाडून पोनि सुरेश निंबाळकर यांनी पथकास मोंडनिंब गावातून जाधववाडी गावाकडे जाणारे रोडवरील गोलावर चौक येथे सापळा लावला. बातमीत नमूद वाहने ही मोडनिंब



गावाकडून गोलावर चौकात येत असताना सापळा पथकाने त्यास बविण्याचा प्रयत्न केला असता सदर कारमधील चालकाने कार वेगाने अरण गावाकडे घेवून पळून जावू लागले. त्यावेळी पोनि सुरेश निंबाळकर, सपोनि धनंजय पोरे व पथकाने सदर कारचा शासकीय वाहनाने पाठलाग केला. सुर्वे यांच्या वस्तीजवळ पळून जाणारे दोन्ही कार हे शासकीय वाहने आडवी लावून आडविण्यात आले. त्यावेळी कारमधील दोन इसमांना जागीच पकडण्यात आले असून तीन इसम हे पळून गेले. त्यातील मारूती सुझुकी ब्रेझा कार क्रमांक MH-45/N-6752 मध्ये एकूण १५ पाकीटे व ट्रीबर कार क्रमांक MH- 45/AQ-7821 मध्ये ३७ पाकीटे प्रत्येक पॉकेटमध्ये असणारे गांजाचे वजन २ किलोच्या आसपास असून त्याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे. सदर दोन्ही कारमध्ये मिळून आलेल्या गांजा मध्ये ब्रीझा कारमध्ये एकूण ५२ पॉकेटमध्ये १०५ किलो ३८० ग्रॅम वजनाचा एकूण किंमती २१,०७,६००/- २) दोन्ही वाहनांची किंमत १५,००,०००/- रूपये असा एकूण ३६,०७,६००/- रूपये किंमतीचे मुद्देमालासह अवैध गांजा हा मादक व नशाकारक अंमली पदार्थाची अवैधपणे विक्री करण्यासाठी ओरीसा येथून घेवून तो अकलूज येथे घेवून जात असताना मिळून आल्याने एकूण ५ आरोपीविरूध्द टेंभूर्णी पोलीस ठाणे गु.र.नं. ८०/२०२४, गुंगीकारक औषण द्रव्य आणि मनोव्यापारावर परीणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८(क), २० (ब) ii(क), २९चे प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्यातील २ आरोपींना अटक करण्यात आलेली असून त्यांची ३१ जानेवारी पर्यंत पो.क.रिमांड आहे. सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली सपोनि. धनंजय पोरे याचे सह सपोफौ. श्रीकांत गायकवाड, निलकंठ जाधवर, म. इसाक मुजावर, पोहेकॉ. परशुराम शिंदे, सलीम बागवान, विजयकुमार भरले, हरिदास पांढरे, पोकॉ विनायक घोरपडे, समर्थ गाजरे, दिलीप थोरात, सतिश कापरे यांनी पार पाडली आहे.

# शेतकऱ्यांचे कर्जमुक्तीसाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना दिले निवेदन!

**नाशिक/प्रतिनिधी**

शासनाच्या चुकीच्या आर्थिक धोरणामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी कर्जबाजारी झालेत तसेच नाशिक जिल्हा को.ऑपरेटिव्ह बँक येथील थकीत कर्जदार शेतकरी ५०३४८ यांना राज्य शासनाने शेत लिलावाच्या नोटीस पाठवून कर्ज वसुलीचे प्रयत्न केलेत. जवळपास ५०० शेतकऱ्यांचे शेतजमिनी वरील सातबारा को-ऑपरेटिव बँक शिवा सहकारी सोसायटी यांच्या नावाने लावण्यात आली. शेतीमालाला भाव कमी देऊन कर्ज हे अनैतिक असल्यामुळे नाशिक येथे १ जून २०२३ गेल्या आठ महिनेपासून ठक्कर बाजार नाशिक (जिल्हा शासकीय रुग्णालय समोर) येथे सभा मंडप टाकून शेतकऱ्यांचे कर्जमुक्ती धरणे आंदोलन सतत चालू आहे. या आंदोलनात सहभागी होऊन शेतकरी-कष्टकरी महासंघाचे शेतकरी नेते धनंजय पाटील कांकडे, शेतकरी संघटना समन्वय समितीचे भगवान बोराडे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे नेते दिलीप पाटील देवडा, दादा अहीरे , आदिवासी संघर्ष समितीचे कैलास बोरसे, थूल बाबा, सुधाकर मोगल व इतर अनेक नेते सतत आठ महिन्यापासून लढा देत आहे. काही गावात झालेले शेतीचे ऱ्हास (लिलाव) सुद्धा रोखण्यात आले होते. २१ व २२ जानेवारी २०२४ ला ढोल वाजवा आंदोलन आमदार- खासदारांच्या घरासमोर या शेतकरी नेत्यांनी करून शासनाच्या कानावर जनजागृती केली, व आमदार खासदार, मंत्र्यांना, सभापती या सर्वांना थकित कर्जदार प्रकरनाचे निवेदने देण्यात आली. श्री झिरवड साहेबाचे मार्फत अजित पवार पर्यंत हे विषय चर्चेसाठी नेलेत, पण शासनाच्या पक्षप्रतिनिधींना निवेदन देऊन सुद्धा काही फारसा उपयोग झाला नाही, त्यानंतर २३ जानेवारी २०२४ ला गोलफ क्लब (अनंत कन्हेरे मैदान) नाशिक येथे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची जाहीर सभा आयोजित होती. नाशिक येथील सभेत संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची कर्जमुक्ती व्हावी, यासाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना स्टेजवर जाऊन प्रोटोकॉल असून सुद्धा निवेदन देण्यात आले. त्यामध्ये शिवसेनेचे उपनेते लक्ष्मणजी वडले जालना व माजी खासदार अनंत गुढे अमरावती, विनायक राऊत सचिव शिवसेना यांनी प्रमुख भूमिका गाजवली, हे निवेदन सादर करताना सोबत, शेतकरी नेतेधनंजय पाटील काकडे, कैलास बोरसे, काँग्रेस नेते दिलीप पाटील देवडा उपस्थित होते. विनायक राऊत (सचिव) यांच्यामार्फत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना निवेदन




देण्यात आले. शेतकरी कर्जमुक्त व्हावा यासाठी पुढील आठवड्यात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्यासोबत नाशिक जिल्हा को-ऑपरेटिव्ह बँकेचे थकीत कर्जदार प्रतिनिधी, तसेच शेतकरी-वारकरी, कष्टकरी महासंघाचे नेते धनंजय पाटील काकडे व शेतकरी संघटना सामान्य समितीचे नेते एकत्र बसून पुढील आठवड्यात मुंबई येथे मातोश्रीवर बैठक घेण्याचे ठरले. या सभेत विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, संजयजी राऊत, लक्ष्मण वडले व तसेच इतर नेत्यांना निवेदने देण्यात आली. संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी कर्जमुक्त होण्यासाठी सामूहिक प्रयत्न केल्या जातील असे धनंजय पाटील काकडे यांनी यावेळी जाहीर केले.

29 JANUARY TO 04 FEBRUARY 2024 - Page 8 (CRIME SANDHYA)_Layout 1 27-01-2024 22:19 Page 1








# प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण

## पालघर जिल्ह्याची विकासाच्या दिशेने वाटचाल -जिल्हाधिकारी



**पालघर/प्रतिनिधी**

विविध शासकीय योजना गरजू लाभार्थींपर्यंत पोहचविण्यात येत आहेत. विकासाची अनेक कामे पुर्ण होऊन नागरीकांचे जिवनमान सुखकर झाले असून जिल्ह्याची विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी केले. भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७४ व्या वर्धापन दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांच्या हस्ते संपन्न झाले. त्यावेळी श्री. बोडके बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, खासदार राजेंद्र गावित, पालघर नगर परिषदेच्या अध्यक्षा उज्वला काळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, जिल्हा पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, उपजिल्हाधिकारी संजिव जाधवर तसेच पत्रकार, लोकप्रतिनिधी,



वरिष्ठ अधिकारी व नागरीक उपस्थित होते. दि. १५ नोव्हेंबर २०२३ रोजी देशातील १०८ आदिवासीबहुल जिल्ह्यांमध्ये 'विकसित भारत संकल्प यात्रे'चा शुभारंभ करण्यात आला असून सदर विकसित भारत संकल्प यात्रेची पालघर जिल्ह्यातील सर्व ...पान ६ वर

# मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील नागरिकांसाठी २३ ते ३१ जानेवारी या कालावधीत सर्वेक्षण-जिल्हाधिकारी गोविंद बोडके

## सर्वेक्षणासाठी ३९३२ प्रगणक तर २९९ पर्यवेक्षक यांची नियुक्ती



**पालघर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगामार्फत मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक मागासलेपण तपासण्यासाठी सर्वेक्षण करण्यात येणार आहे. शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमार्फत दिनांक २३ जानेवारी २०२४ ते ३१ जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये घरोघरी सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी सांगितले. सर्वेक्षणा बाबत माहिती देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले त्यावेळी जिल्हाधिकारी श्री.बोडके बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी अपर्णा सोमाणी - आरोलकर, उपजिल्हाधिकारी संजीव जाधवर, तहसीलदार डॉ.स्वाती घोगडे तसेच पत्रकार उपस्थित होते.

नियुक्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आयोगामार्फत सर्वेक्षणासाठी ओळखपत्र उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच सर्वेक्षणासाठी खास अत्याधुनिक सॉप्टवेअर (ॲप) तयार करण्यात आले आहे.

तालुका निहाय पर्यवेक्षक पुढीलप्रमाणे : पालघर ६१, वसई ५६, डहाणू ७८, वाडा २७, तलासरी ३८, विक्रमगड १३, जव्हार १७, मोखाडा ९. तालुका निहाय पर्यवेक्षकांची संख्या २९९.

तालुका निहाय प्रगणक पुढीलप्रमाणे : पालघर ९०५, वसई ५२५, ...पान ६ वर

# गांधी विचार संस्कार परीक्षेद्वारे मोठ्या भाऊंनी पुढच्या पिढीला मूल्ये, विचार व तत्त्वे दिलीत -नीलकंठ गायकवाड



## जिल्हास्तरीय बक्षीस वितरणात २०६ विद्यार्थ्यांना पदके

**जळगाव/प्रतिनिधी**

गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या गांधी विचार संस्कार परीक्षेद्वारे मोठ्या भाऊंनी पुढच्या पिढीला मूल्ये, विचार व तत्त्वे दिलीत. हाच वारसा घेऊन संस्था वाटचाल करीत असल्याचे प्रतिपादन माजी शिक्षणाधिकारी नीलकंठ गायकवाड यांनी केले. गांधी विचार संस्कार परीक्षेच्या जळगाव जिल्हास्तरीय पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळ मुंबईचे अध्यक्ष जे. के. पाटील, गांधी रिसर्च फाउण्डेशनच्या सौ. अंबिका जैन, डॉ. गीता धर्मपाल, डॉ. अश्विन झाला, वरिष्ठ गांधीयन अब्दुलभाई व परीक्षा नियंत्रक गिरीश कुळकर्णी उपस्थित होते. आपल्या मनोगतात दक्षिण आफ्रिकेतील सैनिक अधिकारी जनरल ...पान ६ वर

# देवणी तहसील कार्यालयातील विशेष सहाय्य योजनेअंतर्गत जवळपास ११५१ लाभार्थ्यांना मंजुरी



**देवणी/प्रतिनिधी**

नवनियुक्त संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष व इतर सदस्य यांचा प्रशासनाच्या वतीने सत्कार करण्यात आला. संजय गांधी निराधार योजनेच्या प्रकरनांना मंजूरी देण्याच्या अनुषंगाने तहसील कार्यालयाच्या सभागृहात नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीत श्रावणबाळ योजना, इंदिरा गांधी वृद्पकाळ योजना, संजय गांधी विधवा योजना व अपंग योजनच्या ११५१ प्रकरनाना मंजूरी देण्यात आली. देवणी तालुका संजय गांधी निराधार योजनेची बैठक समितीचे अध्यक्ष प्रशांत त्र्यंबक पाटील यांचे अध्यक्षेतेखाली तहसीलदार गजानन शिंदे व गटविकास अधिकारी किरण कोळपे तसेच प्रभारी नायब तहसीलदार माधव सांळुके व इतर सदस्य यांच्या प्रमुख उपस्थित नुकतीच बैठक दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी संपन्न झाली. या बैठकीत सर्व प्रकारच्या अर्जाची तपासणी करण्यात आली. तसेच संजय गांधी योजनाचे ...पान ६ वर





